सत्यमेव जयते

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## (२०१७ -२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**नाशिक येथील जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (नाशिक व कळवण) कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच उक्त कार्यालयांतर्गत येणा-या शासकीय यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबतचा**

## नववा अहवाल

( हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक , २०१९
रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
, २०१९

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

**(२०१७ -२०१८)**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**नाशिक येथील जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (नाशिक व कळवण) कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच उक्त कार्यालयांतर्गत येणा-या शासकीय यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबतचा**

## नववा अहवाल

एचबी २५०३—१

## अनुसूचित जमाती कल्याण समिती
## (२०१७-२०१८)

**समिती प्रमुख :**

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(४) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(५) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.
(६) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
(७) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.
(८) श्री. अमित घोडा, वि.स.स.
(९) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.
(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.
(१२) श्री. गोपिकिसन बाजोरिया, वि.प.स
(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१४) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
(१५) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.)
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव
(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

## अनुसूचित जमाती कल्याण समिती
## (२०१५-२०१६)

**समिती प्रमुखः-**

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स.

**सदस्यः-**

(२) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(४) श्री. नारायण कुचे, वि.स.स.
(५) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(६) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(७) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(८) प्रा. चंद्रकात सोनवणे, वि.स.स.
(९) श्री काशिराम पावरा, वि.स.स.
(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(११) श्री. पांडुरंग बरोरा , वि.स.स.
*(१२) श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स.
(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१४) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.
(१५) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
(४) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

*(१) मा. सभापती यांनी श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यांची मुदत दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी संपुष्टात आल्याने व ते पुन्हा विधानपरिषदेवर निवडून आल्याने दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी त्यांची पुन्हा समितीवर समिती सदस्य म्हणून फेरनियुक्ती केली आहे.

**अनुक्रमणिका**


| अनुक्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | **प्रस्तावना** | सात |
| (१) | जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक | १ |
| (२) | जिल्हा परिषद, नाशिक | ८ |
| (३) | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय (नाशिक व कळवण, जि. नाशिक) | २० |
| (४) | बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त (परिशिष्ट-१) | ३१ |

**प्रस्तावना**

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा नववा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ या कालावधीतील अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २९ जून ते १ जुलै, २०१७ या कालावधीत नाशिक येथे भेट देऊन बैठका घेण्यात आल्या होत्या. उक्त बैठकीत जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (नाशिक व कळवण) कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारीवर्गाची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच शासकीय व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्राअंतर्गत अनुसूचित जमातींच्या लोकांसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजना तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातंर्गत येणा-या शासकीय/अनुदानित आदिवासी आश्रमशाळांना भेटी देऊन पाहणी केली. उक्त बैठकीत झालेल्या चर्चेच्यावेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्यांच्या अनुषंगाने समितीने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी नाशिक जिल्ह्यासंदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचार विनिमय करून त्यासंदर्भात नोंदविलेले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

मंत्रालयीन विभागीय सचिवांनी तसेच संबंधित अधिका-यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवनः**
मुंबई,
दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९.

**प्रा. डॉ. अशोक उईके,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

# अहवाल

## जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २९ जून ते १ जुलै, २०१७ या कालावधीत नाशिक जिल्ह्याचा अभ्यास दौरा आयोजित केला होता. सदर दौ-यात समितीने दिनांक २९ जून, २०१७ रोजी नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयास भेट देऊन बैठक घेतली. सदर बैठकीत समितीने अनुसूचित जमाती प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेतली.

**जिल्हाधिकारी कार्यालयातील भरती, बढती, आरक्षण व अनुशेष :**

सदर बैठकीत समितीने जिल्हाधिकारी कार्यालयात अनुसूचित जमाती प्रवर्गातील लिपिक संवर्गात २० पदे जादा भरण्याची कारणे काय आहेत, अशी विचारणा केली असता जिल्हाधिका-यांनी खुलासा केला की, वर्ग ३ आणि वर्ग ४ मधील पद भरती प्रक्रिया जिल्हा निवड समितीमार्फत करण्यात येते. जिल्हा निवड समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी काम करतात. दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी शासनाने एक शासन निर्णय निर्गमित केला होता. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून ५० टक्के पदे पदोन्नतीने व ५० टक्के पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. यापूर्वी लिपिक संवर्गात ७५ टक्के पदे सरळसेवेने व २५ टक्के पदे पदोन्नतीने भरली जात होती. म्हणजेच सरळसेवेचा कोटा कमी करण्यात आला आहे. एकूण ३९२ पदे मंजूर असताना ५० टक्क्याप्रमाणे १९६ पदे सरळसेवेची होतात. नाशिक जिल्ह्यात अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी सरळसेवेमध्ये २२ टक्के आरक्षण आहे. २२ टक्क्यानुसार १९६ पदांमध्ये ४३ पदे अनुसूचित जमातीसाठी येतात. मागील काळातील कोट्यानुसार ७५ टक्केप्रमाणे ६५ पदे येतात. परंतु ६५ ऐवजी ६३ पदे भरली गेली. याच्या पुढचे संवर्ग पाहिले तर ११ पदे कमी दिसतात. शासन निर्णयामध्ये केलेल्या कोट्यातील बदलामुळे ही अडचण निर्माण झालेली आहे. शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी ६५ पदे भरणे आवश्यक होते, परंतु प्रत्यक्षात ६३ पदे भरली गेली. दोन पदे सेवानिवृत्ती/बदलीमुळे रिक्त झाली आहेत.

**जात वैधता प्रमाणपत्राबाबत :**

समितीने, लिपिक व वाहनचालक या संवर्गात भरण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांकडून जातवैधता प्रमाणपत्र घेण्यात आली आहेत काय? अशी विचारणा केली असता जिल्हाधिका-यांनी विदित केले की, २८ पदांपैकी २० कर्मचा-यांकडून जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त झाली आहेत व ८ कर्मचा-यांकडून जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त व्हावयाची असून त्यांना सहा महिन्यांची मुदत आहे. त्यांनी कागदपत्रे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर केली आहेत. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे एकूण ३४ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी २० प्रकरणे नाशिक समितीकडे, औरंगाबाद समितीकडे १० प्रकरणे, नंदूरबार समितीकडे ३

प्रकरणे व अमरावती समितीकडे १ अशी त्याची वर्गवारी आहे. यात ८ प्रकरणे लिपिक व वाहनचालक यांची आहेत. सह आयुक्त, जातपडताळणी समिती यांनी समितीस अशी माहिती दिली की, नाशिक समितीकडे २० पैकी सन १९९५ चे १ प्रकरण व २००३ चे १ प्रकरण अशी दोन प्रकरणे आहेत. ही दोन्ही प्रकरणे अवैध ठरली असून त्याबाबत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. श्री. चव्हाण व श्री. सोनावणे यांच्या प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयाचे अंतरिम आदेश प्राप्त झालेले आहेत. नंदूरबार समितीकडे ३ प्रकरणे प्रलंबित आहेत. नंदूरबार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडील सर्व अधिका-यांची पदे रिक्त आहेत. यावर समितीने, रिक्त पदांची संख्या जास्त आहे, ही पदे तातडीने भरण्याची शिफारस जात पडताळणी समितीने करावी असे सूचित केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात सन २०१४-२०१५ ते २०१६-२०१७ या वर्षात अनुसूचित जमाती प्रवर्गातील सरळसेवेने एकूण ७४ कर्मचा-यांना नियुक्ती देण्यात आली आहे. त्यापैकी १४ कर्मचा-यांनी नियुक्ती पूर्वी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही, प्रमाणपत्र सादर न करण्याची कारणे काय आहे व त्यास कोण जबाबदार आहे ? याबाबत माहिती देण्यास सांगितले असता जिल्हाधिका-यांनी विदित केले की, या १४ कर्मचा-यांना ६ महिन्यांची मुदत दिली आहे. शिवाय प्रत्येकाने प्रस्ताव सादर केलेले आहेत. तसेच पदोन्नतीतील २८ कर्मचा-यांकडून जात वैधता प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहे.

यावर समितीने, काही उमेदवार बनावट जात वैधता प्रमाणपत्र सादर करत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. प्रमाणपत्रावर व्हाईटनर लावून आपले नाव टाकले जाते. त्यामुळे आपल्याकडे सादर झालेली सर्व जात वैधता प्रमाणपत्र पुनर्तपासणी करण्याकरिता धोरण राबवावे. अशा पद्धतीचे व्हाईटनर लावले जाते की, ते प्रमाणपत्र खरे आहे की, खोटे आहे हे ओळखणे अशक्य असते. त्यामुळे सर्वच जात वैधता प्रमाणपत्रे जात पडताळणी समितीकडे पाठवून पुन्हा तपासून घेण्याचे धोरण राबवावे.

**पेसा अंतर्गत भरावयाची पदे :**

समितीने, पेसा अंतर्गत अनुसूचित जमाती क्षेत्रात एकूण ४५ पदे केव्हापासून रिक्त आहेत, रिक्त पदे भरण्याबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत विचारले असता पूर्वी २५ पदे रिक्त होती, त्यापैकी ५ पदे २०१६-१७ मध्ये भरण्यात आली असून २० पदे रिक्त आहेत. पेसाच्या संदर्भात शासनाने जानेवारी, २०१६ मध्ये शासन निर्णय निर्गमित केला आहे. ज्या संवर्गात पेसा अंतर्गत पदे रिक्त आहेत आणि पेसा बाहेरची रिक्त पदे आहेत, त्यापैकी २० टक्के पदे दरवर्षी भरतो. येणा-या ३-४ वर्षाच्या काळात ही सर्व पदे भरणार आहोत. यावर समितीने पेसा क्षेत्रातील १०० टक्के पदे भरली गेली पाहिजेत. जिल्हा स्तरावरील पदे तातडीने भरली गेली पाहिजेत.

समितीने, कृषी विभागामध्ये अनुसूचित जमाती संवर्गातील पदांबाबत माहिती विचारली असता विभागातर्फे सांगण्यात आले की, कृषी विभागामध्ये एकूण १९६ मंजूर पदे असून यामध्ये अनुसूचित जमातीची भरावयाची पदे ४२ आहेत. त्यापैकी २८ पदे २०१२ पासून रिक्त आहेत. यापूर्वी भरतीवर निर्बंध होते. आता भरती प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. काही पदांवर सन २००८ मध्ये तर काही पदांवर सन २०१२ मध्ये शासनाने निर्बंध आणले होते. जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी या कार्यालयास केवळ वर्ग ४ या संवर्गातील पद भरती करण्याचे अधिकार आहेत. इतर पदे भरण्याचा अधिकार कार्यालयाला नाही. वरिष्ठ कार्यालयाकडून भरतीसंदर्भात मागितलेली माहिती सादर करण्यात आलेली आहे. पदांची भरती करण्याबाबत सह संचालक कार्यालयासोबत पत्रव्यवहार केलेला आहे.

**वन खात्यामार्फत राबवावयाच्या योजना :**

समितीने, वन विभागातर्फे किती झाडे लावली आणि किती झाडे जगवलेली आहेत तसेच वन विभागाने किती बंधारे बांधले आहेत व वन्य जीव किती आहे अशी विचारणा केली असता वनाधिका-यांनी विदित केले की, जिल्ह्यात २९.२९ लक्ष झाडे आहेत. पूर्व भागात ७ लाख झाडे आहेत. नियमित वनीकरण योजनेमध्ये मृत झाडांसाठी २० टक्के तरतूद आहे. पाच वर्षापासून हा कार्यक्रम सुरू आहे. इतर विभागांना जे लक्ष दिलेले आहे, त्यांचा समावेशदेखील वन विभागात केला जातो. पावसाळ्यात झाडे लावली जातात, सदरहू कार्यक्रम राबविण्यासाठी ग्रामपंचायत आणि इतर यंत्रणेची मदत घेतली जाते. कळवण येथे लोक सहभाग चांगला असून त्याठिकाणी वनीकरणाच्या माध्यमातून सिताफळाची झाडे लावली आहेत. उप वनसंरक्षक (पूर्व) विभागात ३२३ गावांमध्ये वन व्यवस्थापन समिती स्थापन केलेल्या आहेत. त्यांच्यामार्फत वनीकरणाची कामे हाती घेतली जातात. वनहक्क कायद्यानुसार कार्यवाही करीत असतो. यानुसार वन विभागाने ५० प्रकरणे मंजूर केलेली आहेत. यामध्ये अंगणवाड्या, विद्युत पुरवठा आणि रस्त्यांची कामे मंजूर केली आहेत.

जिल्हाधिका-यांनी पुढे असेही नमूद केले की, नाशिक (प.) अंजनी येथे एका रस्त्याची मागणी केलेली आहे. माननीय न्यायालयाने सदरहू रस्त्याबाबत सकारात्मक दृष्टीकोन दाखविलेला आहे. यासंदर्भातील निर्णय विभागाला प्राप्त झालेला नाही. परंतु, उप वनसंरक्षक स्तरावरून परवानगी न घेता त्यांच्यावर कार्यरत असलेल्या अधिका-यांकडून परवानगी घ्यावी लागणार आहे. त्यामुळे वन संरक्षण कायद्यानुसार परवानगी घेणे बंधनकारक आहे. येवला तालुक्यातील ममदापूर भागात काळवीट अभयारण्य घोषित होणे अपेक्षित आहे. त्या ठिकाणी विकास केला जात आहे. नाशिक विभागात १२६६५ वनपटटयांचे वाटप केलेले आहे.

समितीने यावर, पर्यटन वाढीच्या दृष्टीकोनातून आदिवासी मुलांना गाईडचे प्रशिक्षण देण्यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे असे मत मांडले.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २९ जून ते १ जुलै, २०१७ या कालावधीत नाशिक जिल्ह्याचा दौरा आयोजित केला होता. सदर दौ-याच्या अनुषंगाने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

**जात वैधता प्रमाणपत्राबाबत :**

सदर साक्षीच्यावेळी समितीने जिल्हाधिकारी कार्यालयातील वाहनचालक व लिपिक या पदावरील किती अधिकारी/कर्मचारी यांनी जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर केले नाही अशी विचारणा केली असता जिल्हाधिका-यांनी विदित केले की, लिपिक व वाहनचालकांच्या ३४ पदांपैकी एका कर्मचा-याने जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे. उर्वरित ३३ प्रकरणे प्रलंबित आहेत. सदर प्रकरणे नाशिक, औरंगाबाद, नंदुरबार, अमरावती जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. सन १९९५ नंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचा-यांपैकी केवळ एकाचे जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. उर्वरित कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज केलेला असून त्याची पोचपावती आस्थापनेकडे सादर केलेली आहे.

यावर समितीने, आस्थापना म्हणून त्या जात पडताळणी समितीकडे प्रमाणपत्राबाबत काही पाठपुरावा केलेला आहे का ? सन १९९५ पूर्वी ऑनलाईन पद्धत नव्हती, असे असले तरी जवळ जवळ २० वर्षांनी म्हणजेच सन २०१४ नंतर वैधता प्रमाणपत्र अदयावत केलेली आहेत. शासनाकडे काहींनी जुने वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे. नंतर काही उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केलेले आहेत. ज्या जात पडताळणी समितीकडे नोक-यांचे व शिक्षणाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, त्यांना दोन-चार महिन्यांचा अवधी देऊन, उमेदवारांच्या जात पडताळणी प्रमाणपत्राबाबत पाठपुरावा करणे आवश्यक आहे. जात पडताळणी समितीकडे प्रलंबित प्रस्तावांचा निपटारा करण्याकरिता नोक-या, शिक्षण, न्यायालयीन आदेश आणि मग शेवटी निवडणूक असा जात पडताळणी प्रमाणपत्रांचा प्राधान्यक्रम निश्चित करून दिलेला आहे असे निदर्शनास आणून दिले.

समितीने, असेही निदर्शनास आणून दिले की, अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५ जून, १९९५ पुर्वी नोकरीस लागलेल्या कर्मचा-याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास, त्यांच्या सेवेस संरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. मात्र अशा कर्मचा-यांनी ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जे कर्मचारी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकत नाहीत, अशा कर्मचा-यांच्या सेवेस संरक्षण अनुज्ञेय नाही. अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५ जून, १९९५ पुर्वी नोकरीस लागलेल्या अनेक कर्मचा-यांनी जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्ज न करता अथवा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्र अवैध ठरले जाण्याची वाट न पाहता, अन्य मागास प्रवर्गाचे जात

प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करून सेवेस संरक्षण मिळविले आहे, अशा कर्मचा-याचे पूर्वीचे मूळ अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अधिनियम २००० मधील कलम ७ च्या तरतुदीनुसार जप्त करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. तरी अशा कर्मचा-यांनी आपले अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र, ज्या प्राधिका-याने दिले आहे त्या प्राधिका-याकडे दिनांक ३१ जुलै, २०१३ पूर्वी जमा करावे व त्याबाबतची पोचपावती संबंधित कार्यालयाच्या आस्थापना अधिका-यास सादर करावी अशी पोचपावती सादर करणे आवश्यक असलेल्या कर्मचा-यांकडे पाठपुरावा करण्याची जबाबदारी संबंधित आस्थापना अधिका-याची राहील.

यावर अपर मुख्य सचिव यांनी विदित केले की, ज्या कर्मचा-यांची नियुक्ती दिनांक १८ मे, २०१३ नंतर झालेली आहे अशा सर्व कर्मचारी/अधिकारी यांच्या नियुक्ती आदेशामध्ये दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयाचा उल्लेख असणे आवश्यकच आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांनी दिनांक १८ मे, २०१३ नंतर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांचे नियुक्ती आदेश कशा प्रकारे निर्गमित केले आहेत, त्यासंदर्भातील अहवाल शासनास सादर करावा. सदर अहवालामध्ये दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयाचा उल्लेख केला नसेल तर यापुढे अशा प्रकारचा उल्लेख करणे आवश्यक आहे. अहवाल शासनास प्राप्त करून त्यावर शासनास त्वरित निर्णय घेऊन जातवैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्यास दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार संबंधितांवर त्वरित कारवाई करून त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करावा.

समितीने, जात पडताळणी समिती, नाशिककडे जिल्हाधिकारी कार्यालयातील किती प्रकरणे प्रलंबित आहेत प्रलंबित असलेली प्रकरणे आपल्याकडे केव्हा प्राप्त झालेली आहेत असा प्रश्न केला असता सह आयुक्तांनी विदित केले की, नाशिक समितीकडे १४ प्रकरणे प्रलंबित आहेत. सदर १४ प्रकरणांपैकी ११ प्रकरणे ही दक्षता पथकाकडे आहेत आणि सुनावणीसाठी ३ प्रकरणे प्रलंबित आहेत.

यावर समितीने, जात पडताळणी प्रमाणपत्र लवकरात लवकर सादर करण्यात यावे या अनुषंगाने ज्या त्रुटी आढळून येतात, मूळ कागदपत्रे नसतात, प्रकरण प्रलंबित ठेवण्यात येते, जात पडताळणी समितीकडे त्रुटींची पूर्तता करण्यात येत नाही, त्यामुळे प्रकरणे प्रलंबित राहतात अशा प्रकरणी आपल्या कार्यालयाने सदर प्रकरणांचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे असे विदित केले.

**पेसा अंतर्गत भरावयाची पदे :**

समितीने, पेसा अंतर्गत अनुसूचित जमाती क्षेत्रात अनुसूचित जमातीची २० पदे रिक्त होती. सदर रिक्त पदे भरण्यासंदर्भात काय कार्यवाही करण्यात आलेली आहे, याबाबत माहिती देण्यास सांगितले असता जिल्हाधिका-यांनी नाशिक जिल्ह्यामध्ये सन २०१५ पर्यंत पेसाअंतर्गत वर्गीकरण करण्यात आलेले नव्हते. त्यावेळी जिल्ह्यासाठी आरक्षणाची टक्केवारी २२ टक्के इतकी होती. व जिल्ह्यासाठी तलाठ्यांची मंजूर पदे ही ५५४ होती. सदर पदांपैकी २२ टक्के म्हणजे १२२ तलाठी पदे भरण्यात आली होती. सन २०१५ साली पेसाअंतर्गत वर्गीकरण करण्यात आले होते, त्यात पेसा क्षेत्रामध्ये १९६ तलाठी पदांची वाढ झालेली आहे. १९६ पदे ही पेसा क्षेत्रासाठी

आणि पेसा बाहेरील क्षेत्रासाठी ३५८ पदे मंजूर होती. ३५८ पदांमध्ये ७ टक्के आरक्षण हे अनुसूचित जमाती प्रवर्गातील पदांसाठी राखीव आहे. जरी २० पदे रिक्त दिसत असली तरी प्रत्यक्ष ७ पदेच रिक्त आहेत. मागील दोन वर्षांपासून पदभरती प्रक्रिया न झाल्यामुळे रिक्त पदांची संख्या कमी होऊ शकलेली नाही अशी माहिती दिली.

यावर समितीने, पदभरतीच्या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी जो निर्णय दिलेला आहे त्यासंदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये सदर प्रकरण दाखल करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणाच्या अगोदरपासून आपल्याकडे अनुसूचित जमाती प्रवर्गाची जी पदे रिक्त होती त्याबाबत दौ-याच्या वेळेस समितीला असे आढळून आले की, माननीय उच्च न्यायालय आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देण्यापूर्वी आपल्याकडे अनुसूचित जमाती प्रवर्गाची पदोन्नतीची पदे रिक्त होती. सदर पदांसाठी पात्र असणारे कर्मचारी देखील उपलब्ध होते पण आपल्या कार्यालयाकडून संबंधितांना पदोन्नती देण्यात आलेली नाही.

दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने समितीच्या असे लक्षात आले आहे की, यापूर्वी, कर्मचारी / अधिका-यांची भरती करण्यासाठी वापरलेले अथवा भरलेले बिंदू चुकीचे आहेत. ते बिंदू रिक्त करून अनुसूचित जमातींच्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचा-यांची भरती करणे आवश्यक आहे.

यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, आदिवासी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली एक मंत्रिमंडळ उप समिती नेमली आहे. ही मंत्रिमंडळ उप समिती शिफारस करेल त्याप्रमाणे निर्णय घेणार आहोत. शिवाय त्यानंतरच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या निर्णयानुसार डिसेंबर, २०१९ पर्यंत कार्यवाही करावी असा निर्णय दिलेला आहे.

समितीने, त्यावर पदोन्नतीचे आरक्षण असताना ह्या बाबी पूर्ण करावयास पाहिजे होत्या त्यावेळी त्या करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे अनुसूचित जमातींच्या कर्मचा-यावर अन्याय झाला आहे. याबाबतीत ज्याने चुकीची कार्यवाही केली असेल त्याच्यावर कारवाई प्रस्तावित करावी आणि तत्संदर्भातील अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**अभिप्राय व शिफारशी :**

**जिल्हाधिकारी कार्यालयातील भरती, बढती, आरक्षण व अनुशेष :**

समितीने दिनांक २९ जून, २०१७ रोजी नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीच्यावेळी कृषी विभागामध्ये अनुसूचित जमातीच्या भरावयाच्या ४२ पदांपैकी २८ पदे सन २०१२ पासून रिक्त असल्याचे तसेच

यापूर्वी भरतीवर निर्बंध होते, त्यामुळे भरती करता आली नाही असे समितीस सांगितले. **प्रशासनाच्या दृष्टीने एवढया मोठया प्रमाणावर पदे रिक्त राहणे योग्य नाही. जनतेला कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ वेळेत होण्याच्या दृष्टीने अनुसूचित जमातीची कृषी विभागातील २८ रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

समितीने नाशिक जिल्हा दौ-यांसदर्भात दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्यावेळी समितीने, पेसा अंतर्गत अनुसूचित जमाती क्षेत्रात अनुसचित जमातीची २० पदे रिक्त होती. पुर्वी जिल्ह्यासाठी आरक्षणाची टक्केवारी २२ टक्के इतकी होती. मागील दोन वर्षापासून पदभरती प्रक्रिया न झाल्यामुळे रिक्त पदांची संख्या कमी होऊ शकलेली नाही. **याबाबत समितीची अशी शिफारस आहे की, नाशिक जिल्ह्यात पेसा कायद्यांतर्गत १००% भरावयाच्या प्रक्रियेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी तसेच रिक्त असलेली २० पदे भरून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी.**

माननीय उच्च न्यायालयाने दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी निर्णय देण्यापूर्वी अनुसूचित जमाती प्रवर्गाची पदोन्नतीची पदे रिक्त होती. सदर पदांसाठी पात्र असणारे कर्मचारी देखील उपलब्ध होते पण जिल्हाधिकारी कार्यालयाकडून संबंधितांना पदोन्नती देण्यात आलेली नाही. पात्र अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील अधिकारी/ कर्मचा-यांची पदोन्नती करणे आवश्यक होते. **त्यामुळे अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांना त्या त्या वेळी पदोन्नती न दिल्याने त्यांच्यावर अन्याय झाला आहे ही अतिशय गंभीर बाब आहे. या विलंबास जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**जात पडताळणी :**

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील नाशिक जात पडताळणी समितीकडे १४ प्रकरणे प्रलंबित असून यातील ११ प्रकरणे ही दक्षता पथकाकडे आहेत आणि सुनावणीसाठी ३ प्रकरणे प्रलंबित असल्याचे समितीला सांगण्यात आले. प्रलंबित प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाने सदर प्रकरणांचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. **जिल्हाधिकारी कार्यालयाने जातपडताळणीची प्रलंबीत प्रकरणे त्वरित निकाली काढण्यासाठी उमेदवारांकडून राहिलेल्या त्रुटींची पूर्तता करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

समितीच्या दौ-यांच्या वेळी समितीच्या असे लक्षात आले की, नंदूरबार तसेच राज्यातील इतर अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीवरील अधिका-यांची पदे रिक्त आहेत. अधिका-यांची पदे रिक्त असतील तर जातपडताळणीची प्रकरणे वेळेत मार्गी कशी लागतील असा प्रश्न आहे **त्यामुळे याबाबत समिती शासनास अशी शिफारस करते की, नंदूरबार तसेच राज्यातील इतर अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समितीकडील अधिका-यांची पदे त्वरीत भरण्यात यावीत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करावी.**

समितीला अनेक ठिकाणी काही उमेदवार बनावट जातवैधता प्रमाणपत्र सादर करीत असल्याचे निदर्शनास आलेले आहे प्रमाणपत्रावर व्हाईटनर लावून आपले नाव टाकले जाते. अशा पद्धतीचे व्हाईटनर लावले जाते की, ते प्रमाणपत्र खरे आहे की, खोटे आहे हे ओळखणे अशक्य असते. त्यामुळे ख-या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांवर अन्याय होत असतो त्यामुळे सादर झालेली सर्व जात वैधता प्रमाणपत्र पुनर्तपासणी करण्याकरीता धोरण राबविणे गरजेचे आहे. **त्यामुळे सर्वच जात वैधता प्रमाणपत्रे जात पडताळणी समितीकडे पाठवून पुन्हा तपासून घेण्याचे धोरण राबविण्यात यावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

## जिल्हा परिषद, नाशिक

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक ३० जून, २०१७ रोजी नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली होती. सदर भेटीदरम्यान झालेल्या बैठकीच्या वेळी समितीने नाशिक जिल्हापरिषदेतील अनुसूचित जमाती प्रवर्गातील वरिष्ठ सहायक (लि) या संवर्गातील दोन पदे केव्हापासून रिक्त आहेत व रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे. याबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिका-यांनी समितीस विदित केले की, एक पद हे दोन महिन्यापूर्वी रिक्त झाले होते आणि १ पद हे पदावनतीमुळे रिक्त झाले आहे. गेल्या दीड वर्षापासून जिल्हा परिषदेत भरती प्रक्रिया झालेली नाही. पूर्वी माननीय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती होती. आता त्या निवड समितीद्वारे भरती न होता, एकत्रितपणे जाहीरात देऊन शासनस्तरावरुन ऑनलाईन पद्धतीने भरती प्रक्रिया केली जाणार आहे. रिक्त पदाबाबत जिल्हा परिषदेने ऑनलाईन पद्धतीने शासनाला माहिती द्यावयाची आहे आणि त्यानंतरच शासनस्तरावरुन ऑनलाईन पद्धतीने भरती प्रक्रिया केली जाणार आहे.

### जिल्हापरिषदेतील पर्यवेक्षिका व अंगणवाडी सेविकांबाबत :

समितीने, पर्यवेक्षिकांची (अंगणवाडी सेविकांमधून निवडीने) अनुसूचित जमातीची २१ पदे रिक्त राहण्याची कारणे तसेच नाशिक जिल्ह्यात किती अंगणवाडी सेविका आहेत आणि त्यामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचा-यांची संख्या किती आहे ? अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिका-यांनी नमूद केले

की, माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक ९ जून, २०१४ रोजीच्या अधिसूचनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पदे स्थानिक अनुसूचित जमाती उमेदवारांमधून भरण्याबाबत आदेश असल्यामुळे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ५ मार्च, २०१५ आणि शासन शुद्धीपत्रक दिनांक २६ जून, २०१५ नुसार आरक्षण निश्चित केले आहे. जिल्हा परिषदेत ६ संवर्ग असून १०० उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गातील घेत असतो. आता त्यांचे प्रमाण बदलल्यामुळे पर्यवेक्षिकाची (अंगणवाडी सेविकांमधून निवडीने) अनुसूचित जमातीची २१ पदे रिक्त दिसत आहेत. नाशिक जिल्ह्यात अंगणवाडी सेविकांची २४८५ पदे मंजूर आहेत. यापैकी २४१७ अंगणवाडी सेविकांची पदे भरलेली आहेत. ६८ पदे रिक्त आहेत. अंगणवाडी मदतनिसांची २४८५ पदे मंजूर आहेत.

**वित्त विभाग :**

समितीने, अनुसूचित जमाती प्रवर्गातील वरिष्ठ सहायक लेखा या संवर्गातील ३ पदे रिक्त झालेली असल्याने सरळसेवेमध्ये दाखविण्याचे कारण काय व रिक्त झालेली पदे केव्हापर्यंत भरण्यात येणार आहेत असा प्रश्न केला असता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी नमूद केले की, अनुसूचित जमाती प्रवर्गातील वरिष्ठ सहायक लेखा या संवर्गातील ३ रिक्त पदांपैकी एक पद दिनांक ९ नोव्हेंबर, २०१४ रोजी आणि उर्वरित २ पदे दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी रिक्त झाली होती. बिंदूनामावलीनुसार ते पद अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी असल्याने भरले आहे. उर्वरित पदे पुढील भरतीच्यावेळी भरण्यात येतील. असे जिल्हा परिषदेकडून विदित केले.

**पंचायत विभाग :**

समितीने अनुसूचित जमातीतील विस्तार अधिकारी (पंचायत) यांची तदर्थ पदोन्नती ही सरळसेवेच्या कोटयातील पदावर तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेली असून रिक्त असलेले १ पद सरळ सेवेने भरती प्रक्रियेद्वारे भरता येत नाही असे असताना सुद्धा ते पद भरले आहे याबाबत खुलासा करण्यास सांगितले असता उपमुख्य कार्यकारी अधिका-यांनी विदित केले की, विस्तार अधिकारी या पदावरुन सहाय्यक गटविकास अधिकारी या पदावर पदोन्नती दिली जाते. जिल्हापरिषदेमध्ये एकूण १६ संवर्ग आहेत. जिल्हा परिषदेमध्ये एकाच वेळी दिनांक १२ मे, २०१४ रोजी शासन स्तरावरुन ६ कर्मचा-यांची विस्तार अधिकारी (पं) वरुन सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून पदोन्नती झाली. दिनांक २२ जून, २०१५ रोजी एक पदोन्नती झाली. या पदोन्नतीत सरळसेवेने विस्तार अधिकारी आले होते. रिक्त झालेले पद सरळसेवेचे असल्यामुळे तदर्थ पदोन्नती दिलेल्या लोकांमधून भरावे किंवा कसे तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती दिली असल्यामुळे ११ महिने अथवा आयोग पुरस्कृत उमेदवार उपलब्ध होईल तोपर्यंत ही पदोन्नती अस्तित्वात राहील. या संदर्भात मार्गदर्शन मागितले असून त्याचा व्यक्तिगत पाठपुरावा सुरू आहे.

ग्रामसेवक पदाची बिंदूनामावली तपासल्यानंतर आदिवासी उपयोजना क्षेत्रात ३२३ पदांचा अनुशेष आहे. दिनांक २६ जून, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद १३(२) नुसार दोन प्रकारची बिंदूनामावली सुरू

झाली आहे. आदिवासी क्षेत्रात, ज्या ग्रामपंचायती आहेत तेथे १०० टक्के आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रात ७ टक्के प्रमाणे पदे भरावयाची आहेत. पूर्वी हे २२ आणि ७ टक्के असे प्रमाण होते, आता १०० आणि ७ टक्के झाले आहे. त्यामुळे ३२३ पदे दिसत असली तरी त्या पदावर ग्रामसेवक कार्यरत आहेत, टप्प्याटप्प्याने त्याचे समायोजन करावयाचे आहे. आता शासन स्तरावरुन भरती करणार आहे. सद्य:स्थितीत पेसा अंतर्गत एकही पद रिक्त नाही कार्यालयाकडे जे २२ अर्ज आलेले आहेत. त्यांना आंतर जिल्हा बदलीने आम्ही पेसा अंतर्गत देणार आहोत शासन निर्णयानुसार बिगर आदिवासी क्षेत्रातील कर्मचारी जाण्यास तयार असतील त्यांचा विकल्प घेण्याबाबतची प्रक्रिया सुरू करणार आहोत.

समितीने यावर, पेसा क्षेत्रामध्ये ५ टक्के पदे सरळसेवेने भरण्यास परवानगी दिली आहे. जर जास्त संख्येने पदे रिक्त असतील तर पेसा क्षेत्रामध्ये १०० टक्के पदे भरली गेली पाहिजेत. आपल्या कार्यालयात गेली २ वर्षे ३२३ पदे अनुशेषाची आहेत, त्या संदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली दिसत नाही ग्रामसेवक हा जिल्हा परिषदेचा कर्मचारी आहे. जिल्हा परिषदेतून बदलून जात असताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांच्याकडे जाईल, हजर झाल्यानंतर पेसा क्षेत्रातील पदे पहिल्यांदा पूर्णपणे भरली पाहिजेत, रिक्त पदे असतील तर तेथे प्रथम नेमणूक दिली पाहिजे असे लक्षात आणून दिले असता जिल्हा परिषदेकडून नमूद करण्यात आले की, दिनांक २६ जून, २०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे बिंदूनामावली तपासल्यानंतर ही प्रक्रिया झाली आहे. ३२३ पदे आम्हाला समायोजित करावयाची आहेत, त्यानंतर नॉन पेसा एरियामध्ये जे आहेत त्यांना पेसा एरियामध्ये घेण्याची कार्यवाही करीत आहोत. जसजशी आदिवासी क्षेत्रातील पदे रिक्त होतील तसतशी आम्ही भरती करु. प्रत्यक्षात ८६ पदे रिक्त आहेत. मंजूर पदानुसार रोस्टर काढले जाते. २०१५ नंतर भरती प्रक्रिया झालेली नाही म्हणून आम्ही प्रतिक्षेत आहोत. दोन प्रकारचे रोस्टर तपासून झाले आहे. बिगर आदिवासी व आदिवासी क्षेत्रातील ८६ पदे आहेत, ती या भरती प्रक्रियेमध्ये भरणार आहोत.

**आरोग्य विभाग :**

समितीने, आरोग्य सेवक (पुरुष) या संवर्गातील १४९ पदे केव्हापासून रिक्त आहेत, रिक्त पदांचा अनुशेष केव्हा भरण्यात येईल तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना काही पदे भरण्याचे अधिकार आहेत त्यांनी किती पदांची भरती केलेली आहे असा प्रश्न केला असता आरोग्य अधिका-यांनी विदित केले की, आरोग्य सेवा संचालनालयाकडून दिनांक ८ मार्च, २०१६ रोजीच्या पत्रानुसार अतिरिक्त २०४ पदे मंजूर झाली. या शिवाय नवीन उपकेंद्रे मंजूर झाल्यामुळे अजून १३ पदे निर्माण झाल्याने एकूण २१७ अतिरिक्त पदे जिल्ह्यासाठी मंजूर झाली. बिंदू नामावलीत बदल झाल्यामुळे १४९ पदे रिक्त आहेत. मागील वर्षीच्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेसाठी अतिरिक्त पदे मंजूर झाली आहेत. आरोग्य सेवक (पुरुष) २०४ पदे मंजूर झाली असून आरोग्य सेवक (महिला) ३५९ अतिरिक्त पदे मंजूर झाली आहेत. शासनाकडून प्रत्येक जिल्ह्याला अतिरिक्त पदे मंजूर झाली. परंतु भरती करण्यास मान्यता दिलेली नाही. भरतीची मान्यता मिळाल्यानंतर पदे भरणार आहोत. आरोग्याच्या बाबतीत शासनाने सूट दिलेली आहे.

नाशिक जिल्ह्यात वैद्यकिय अधिका-यांची ५९ पदे रिक्त आहेत. मागील वर्षी नाशिक मध्ये १२ पदे भरण्याची मान्यता देण्यात आली होती व त्यापैकी ८ उमेदवार पात्र होते. त्यापैकी केवळ ४ एमबीबीएस डॉक्टर्स रुजू झाले व ४ उमेदवारांनी रुजू होण्यास नकार दिला. बाकीची पदे राज्य स्तरावरुन भरली जातात. जिल्हा शल्य चिकित्सकाकडे ८ पदे आणि प्राथमिक आरोग्य केंद्राकडे ४ पदे अशा १२ पदासंदर्भात शासन निर्णय आलेला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

समितीने आरोग्य विभागातील औषध निर्माण अधिकारी ४ पदे, प्रयोग शाळा तंत्रज्ञ ६ पदे आणि आरोग्य पर्यवेक्षक १ पद ही पदे केव्हा पासून रिक्त आहेत व पदे भरण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता आरोग्य अधिका-यांकडून विदित करण्यात आले की, यामधील १ पद ग्रामपंचायतीच्या आस्थापनेवर असलेल्या कर्मचा-यासाठी राखीव ठेवण्यात आले असल्यामुळे ते रिक्त आहे. तर २ पदे आंतर जिल्हा बदलीमुळे रिक्त आहेत. संबंधित कर्मचा-याची ग्रामपंचायतीमध्ये १० वर्षे सेवा झालेली पाहिजे. त्यांचा लॉकिंग कालावधी ४५ वर्षांचा आहे. औषध निर्माण अधिकारी या संवर्गाकरिता असलेली शैक्षणिक अर्हता ग्रामपंचायत कर्मचा-यांमधून उपलब्ध झाली नाही. त्यामुळे ते पद रिक्त आहे.

समितीने, आरोग्य सेवक (महिला) अनुसूचित क्षेत्रातील पदे आरक्षण १०० टक्के अनुसूचित जमातीसाठी दाखविण्यात आलेली आहेत. यामध्ये एकूण मंजूर पदे ४५६ आहेत. परंतु अनुसूचित जमातीची १३७ पदे भरलेली आहेत. त्यांमध्ये रिक्त पदे ३१९ दाखविण्यात आलेली आहेत. याबाबत सविस्तर माहिती देण्यास सांगितले असता आरोग्य अधिका-यांनी नमूद केले की, आरोग्य सेवक (महिला) या संवर्गातील ४५६ पदे मंजूर आहेत. यांमध्ये ३१९ पदांचा अनुशेष आहे. दिनांक ८ मार्च, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार आरोग्य सेवक (महिला) यांची ३५९ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. तसेच यावर्षी दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार नाशिक जिल्ह्यात १३ उप केंद्रांना मंजुरी दिल्यामुळे १५ पदे वाढली आहेत. त्यामुळे एकूण ३७४ पदे वाढलेली असल्यामुळे रिक्त पदांची संख्या ३१९ दिसत आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील उप केंद्रांची संख्या ३०० असून ५३ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. या ५३ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आरोग्य अधिका-यांची २४ पदे रिक्त आहेत.

**शिक्षण विभाग :**

समितीने, पेसामध्ये किती शाळा आहेत ? तसेच एकूण शिक्षक व विद्यार्थी किती आहेत असे विचारले असत शिक्षणाधिका-यांनी विदित केले की, एकूण पेसामध्ये १,८७१ शाळा असून १२,०६४ शिक्षक आहेत. एकूण ५०८१ मंजूर पदे असून, यामध्ये अनुसूचित जमातीसाठी २०१५ पदे आरक्षित आहेत. त्यापैकी ३०६४ पदांचा अनुशेष आहे. अनुसूचित क्षेत्रामध्ये एसटीच्या कॅटेगिरीमधील स्थानिक उमेदवारांना पदोन्नती दिलेली आहे. दिनांक २३ जून, २०१७ रोजी एक नवीन शासन निर्णय निर्गमित झालेला आहे. त्यानुसार ऑनलाईन परीक्षा होणार आहे. शाळांमधील विद्यार्थ्यांची अंदाजित संख्या ही दीड लाखांच्या आसपास आहे.

**सामान्य प्रशासन विभाग :**

समितीने विस्तार अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, वाहनचालक या संवर्गांची बिंदूनामावली मागासवर्ग कक्षाकडून सन २०१०-११ नंतर तपासलेली नसण्याची कारणे विचारली असता, उप मुख्य कार्यकारी अधिका-यांनी विदित केले की, वरिष्ठ सहाय्यक (सांख्यिकी) व विस्तार अधिकारी (सांख्यिकी) ही एकाच वेतनश्रेणीतील पदे आहेत. विस्तार अधिकारी (सांख्यिकी) हे पद व्यपगत केलेले आहे. सरळसेवेचे पद भरण्याबाबत दिनांक १८ मार्च, २०१३ रोजी शासनाला विनंती केली आहे. त्यामुळे बिंदूनामावली तपासता आलेले नाही.

समितीने, शासनस्तरावर अजून कोणकोणते विषय प्रलंबित आहे, यासंदर्भात समितीला सर्व विभागाच्या अधिका-यांनी माहिती द्यावी, जेणेकरून त्याबाबत समिती संबंधित विभागाला शिफारस करू शकेल असे आश्वस्त केले असता, जिल्हापरिषदेने सहाय्यक विस्तार अधिकारी यांच्या पदोन्नतीसंदर्भात कनिष्ठ आरेखक हे पद २५ टक्के सरळसेवेने व ७५ टक्के पदोन्नतीने भरण्यात येते. ७५ टक्के पदोन्नतीची पदे डाईंग केडर असून ते १०० टक्के सरळ सेवेने भरण्याबाबतचा प्रस्ताव सन २०१० मध्ये शासनास सादर केलेला आहे. तसेच सेवा प्रवेश नियम बदलण्यासाठी शासनाने विभागीयस्तरावर समित्या स्थापन केल्या होत्या त्यांचे अहवाल सादर झालेले असून त्याबाबतची प्रक्रिया शासनस्तरावर सुरू आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये १५ तालुक्यांपैकी ९ तालुके आदिवासी तालुके आहेत. माननीय राज्यपाल आणि न्यायालयाच्या आदेशानुसार पेसा क्षेत्र १०० टक्के भरणे अनिवार्य केलेले आहे. आदिवासी जिल्ह्यामध्ये ४ टक्के किंवा ५० टक्केच्या ऐवजी अगोदर भरण्याची परवानगी देण्यात यावी. म्हणजे अनुशेष भरता येईल. परिचरमधून कनिष्ठ सहाय्यकाच्या पदोन्नतीचा एक विषय आहे. पुर्वीच्या सेवाप्रवेश नियमानुसार संबंधित परिचर इयत्ता १० वी पास झाल्यास आणि त्याच्याकडे टंकलेखन आणि संगणकाचे प्रमाणपत्र असेल तर त्याचे कनिष्ठ सहाय्यक या पदावर पदोन्नती होत होती. परंतु सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या सर्व पदांना पदवीधर असणे आवश्यक करण्यात आलेले आहे. त्यावर जिल्हापरिषदेने शासनाकडून असे मार्गदर्शन मागविलेले आहे की, पदवीधर अर्हतेची अट ठेवली तर बरेचसे परिचर पदोन्नतीपासून वंचित राहील. ज्यांच्या सेवा दहा ते वीस वर्षांपर्यंत झालेल्या आहेत, त्यांना पदोन्नतीच मिळणार नाही. त्यामुळे यासंदर्भात समितीने शिफारस करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

**जात पडताळणी :**

समितीने, सन १९९५ पूर्वीचे बिंदू रिक्त करण्याबाबत विचारले असता, उप मुख्य कार्यकारी अधिका-यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेमध्ये सन १९९५ पूर्वीचे सेवेत रुजु झालेले १३५४ कर्मचारी आहेत. यांपैकी १२७४ कर्मचा-यांची जात पडताळणी झालेली आहे. जात पडताळणी न झालेले कर्मचारी ८० आहेत तसेच जात पडताळणी समितीकडे सादर केलेले प्रस्ताव ५२ आहेत. ही प्रकरणे सन १९९५ च्या पूर्वीची आहेत. बिंदू रिक्त करण्यासंदर्भात नस्ती सादर करण्यात आलेली आहे.

अपर आयुक्तांनी पुढे नमूद केले की, समितीच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व अशा प्रकरणांची सखोल चौकशी करून १५ दिवसांच्या आत कार्यवाही करण्यात येईल. दिनांक ८ सप्टेंबर, २००१ ते आतापर्यंत १६०१ कर्मचा-यांपैकी १५०४ कर्मचा-यांची जात पडताळणी प्रमाणपत्र झालेली आहेत्त. पडताळणी प्रमाणपत्र सादर न झालेले ३६ कर्मचारी आहेत. १८ प्रकरणे समितीकडे सादर करण्यात आलेली आहेत. १९ कर्मचा-यांनी प्रस्ताव सादर केलेले नाहीत. सामान्य प्रशासन विभागाचे १ प्रकरण अवैध ठरविले होते व त्यामुळे त्या कर्मचा-यास बडतर्फ करण्यात आलेले आहे. त्यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली होती, परंतु उच्च न्यायालयाने प्रशासनाच्या निकाल दिलेला आहे. त्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात अपील केले, परंतु सर्वोच्च न्यायालयाने प्रशासनाच्या बाजुनेच निकाल दिल्यामुळे त्यांना बडतर्फ करण्यात आलेले आहे.

समितीने, शिक्षण विभागातील जात प्रमाणपत्र पडताळणीबाबत माहिती देण्यास सांगितले असता शिक्षणाधिका-यांनी विदित केले की, शिक्षण विभागामध्ये (प्राथमिक) ३२ कर्मचा-यांची जात पडताळणी झालेली नाही. त्यांपैकी १४ कर्मचा-यांनी समितीकडे प्रस्ताव सादर केलेले असून १८ शिक्षण अधिका-यांनी प्रस्ताव सादर केलेले नाहीत. त्यांना आतापर्यंत २ नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. त्यांच्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल. १२ कर्मचारी वसति शाळेमधील होते. ते जरी अनुसूचित जमाती या प्रवर्गातील असले तरी त्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्याने त्यांना खुल्या प्रवर्गातून सेवेत घेण्यात येईल कारण ते ज्यावेळी सेवेत रुजु झाले त्यावेळी त्यांना आरक्षण लागू नव्हते.

समितीने, यावर जात पडताळणी समितीकडे अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. काही प्रकरणे ही सन २००५च्या पूर्वीची असून एवढी वर्षे प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत, जात पडताळणी समितीने जो काही निर्णय दिलेला असेल तो तातडीने देणे अभिप्रेत आहे. एखाद्या कर्मचा-याला जात पडताळणी सादर न केल्यामुळे त्याला सेवेतून कमी केले जाते. त्यामुळे असा कर्मचारी मॅटमध्ये धाव घेतो. जिल्हा परिषदेला कोर्टकचेरीचा खर्च नाहक सहन करावा लागतो. त्यामुळे जात पडताळणी समितीकडे असणारी सर्व प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी सूचना केली.

**पशुसंवर्धन विभाग :**

समितीने, पशुसंवर्धनाची (पशुधनाची) संख्या किती आहे विशेषतः गायींची संख्या किती आहे, दुधाचे प्रमाण किती आहे, LSS ची संख्या किती आहे, LDO डॉक्टराची संख्या किती आहे, आदिवासी भागात TSP चा निधी खर्च केलेला आहे काय, असल्यास, त्या ठिकाणी किती शेळी गट वाटप केलेले आहे, याबाबत माहिती देण्यास सांगितले असता पशुधन अधिका-यांनी विदित केले की, पशुधनामध्ये गायींची संख्या १० लाख १५ हजार ८७७ एवढी आहे तर म्हशींची संख्या २ लाख ३७ हजार ५२१ एवढी असून शेळ्यांची संख्या ५ लाख ९९ हजार ८२० एवढी आहे.

जिल्हा पशुसंवर्धन अधिका-याचे एक पद आहे. पशुधन विकास अधिकारी, गट-अ आणि गट-ब यांपैकी मंजूर १२५ पदे आहेत. त्यांपैकी ९९ पदे भरलेली असून, २६ पदे रिक्त आहेत. सहाय्यक पशुसंवर्धन विकास अधिकारी ३६ पदे भरलेली आहेत. पशुसंवर्धन यांचे गट-क मध्ये १२७ पदांपैकी १२५ पदे भरलेली आहेत आणि दोन पदे रिक्त आहेत. आदिवासी भागात आदिवासी उपयोजनेचा निधी शेळी गट वाटपासाठी खर्च केलेला आहे.जिल्ह्यातील ९ तालुक्यांमध्ये १०१ संस्था आहेत. प्रत्येक संस्थेला एक लक्षांक दिलेला असतो. इगतपुरीमध्ये डांगी भिडे, जर्सी, HF असून या गायीपासून १४ लिटर दूध मिळते. औषधासाठी आदिवासी विभागाकडून ९९.५० लक्ष रुपये मिळाले असून, हा सर्व खर्च केलेला आहे. औषधांमध्ये सर्व प्रकारची ॲन्टीबायोटीक्स आणि इतर संबंधित औषधे खरेदी केलेली आहेत.

**लघुपाटबंधारे विभाग :**

समितीने, लघुपाटबंधारे विभागाला किती निधी प्राप्त झाला, त्यापैकी किती निधी खर्च झाला व त्या निधीमध्ये कोणकोणती कामे पूर्ण करण्यात आली, याबाबत माहिती देण्यास सांगितले असता अभियंत्यांनी विदित केले की, २७ कामे झाली असून २० कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०१४-२०१५ मध्ये १४२ लाख रुपये प्राप्त झाले होते. सिन्नर तालुक्यातील ७ व चांदवड तालुक्यातील ९ निवडक गावांमध्ये कामे करण्यात आलेली आहेत. टीएसपी क्षेत्रात ७५ टक्केपेक्षा पुढील गावे चांदवड तालुक्यामध्ये ३ आहेत व सिन्नर तालुक्यामध्ये ३ आहेत. तसेच ५० ते ७५ टक्केची ६ गांवे अशी एकूण १२ गावांतील बंधा-यांच्या कामांवर हा निधी खर्च करण्यात आलेला आहे. सन २०१५-२०१६ मध्ये ३५४ लाख रुपये निधी प्राप्त झाला होता. त्यांपैकी ९१ लाख रुपये बंधा-याच्या कामांवर खर्च झालेले आहेत. ४७-७२ या हेडखाली २०१४-२०१५ मध्ये एकूण निधी २,३९३ लाख रुपये होता. यातील २,२१० लाख रुपये केटी वेअरची दुरुस्ती, बंधारे व पाझर तलावावर खर्च झालेला आहे. दिंडोरी, इगतपुरी, घोटी येथील उपसा सिंचन योजनेची कामे निधी अभावी बंद आहेत. याकरिता गेल्या ३ वर्षांपासून निधी आलेला नाही. निधीची मागणी सातत्याने केली जात आहे. त्यासाठी वाढीव निधीची मागणी करण्यात येईल.

**ग्रामीण पुरवठा :**

समितीने, ग्रामीण पाणीपुरवठा उपयोजनांबाबतची सविस्तर माहिती देण्यास सांगितले असता, कार्यकारी अभियंत्यांनी नमूद केले की, ग्रामीण पाणीपुरवठा विभागास सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात ९ कोटी ४४ लाख रुपये प्राप्त झाले होते. त्यांपैकी ७ कोटी ५६ लाख रुपये खर्च झालेले आहेत. हा निधी खर्च करण्यास २ वर्षे परवानगी असते, त्यानुसार पुढील आर्थिक वर्षात १०० टक्के निधी खर्च झालेला आहे. सन २०१५-२०१६ मध्ये १२ कोटी १५ लाखइतका निधी प्राप्त झाला होता. त्यातून ५ कोटी १५ लाख ६८ हजार रुपये खर्च झालेले आहेत. त्या वर्षी ६९ योजना होत्या व त्यातील ४५ योजना कार्यान्वित करण्यात आल्या. उर्वरित योजना पुढील आराखड्यात म्हणजेच सन २०१६-२०१७ मध्ये पूर्ण करण्यात आल्या आहेत. सन २०१६-

२०१७ मध्ये १४५५ कोटी रुपये प्राप्त झाले होते व त्यातून ७३८ कोटी रुपये खर्च झाले होते. पाणी पुरवठा योजनेची कामे राष्ट्रीय ग्रामीण पेय जल अंतर्गत ग्रामपंचायत समित्यांकडून केली जातात. तसेच आता मुख्यमंत्री पेय जल योजना हा नवीन कार्यक्रम आलेला असून या योजनेचे अधिकार जिल्हा परिषदेला दिलेले आहेत.

यावर समितीने, संबंधित योजना त्या त्या आर्थिक वर्षात कार्यान्वित होणे अपेक्षित असताना पुढील वर्षात कशा पूर्ण करण्यात आल्या ? या वर्षीचे पैसे पुढील वर्षी खर्च केले जाऊ शकतात, परंतु या वर्षीच्या योजना पुढील वर्षात कशा करता येतील .मागील ३ वर्षपासून त्या त्या वर्षात योजना पुर्ण झालेल्या नाहीत व त्या योजनांचे पैसेही खर्च झालेले नाही. ज्या समित्यांना पैसे देण्यात आले होते, परंतु त्यांनी योजना पूर्ण केलेल्या नाहीत, तसेच त्यांचे रेकॉर्डही सापडत नाही. पुढे ग्रामपंचायतीची सत्ता बदलते व समितीही बदलते. अशा लोकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे, जेणेकरून राज्यभर चांगला संदेश जाईल पाणीपुरवठा समितीच्या अध्यक्षाच्या मालमत्तेवर तसेच त्यांच्या ७/१२ वर बोजा चढविण्यात यावा, असे समितीने निदेशित केले.

**आरोग्य विभाग :**

समितीने, आरोग्य विभागाची माहिती देण्यास सांगितले असता, आरोग्य अधिका-यांनी माहिती देताना सांगितले की, सन २०१४-२०१५ मध्ये ९८ कामे प्रस्तावित केली होती. यांपैकी ९८ कामे पूर्ण झालेली आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये २१३ कामे प्रस्तावित केली होती. ही सर्व २०९ कामे पूर्ण झालेली आहेत आणि ४ कामे प्रगतीपथावर आहेत. जिल्ह्यात ४ ठिकाणच्या आदिवासी भागात प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झालेली असून, सद्य:स्थितीत बांधकाम सुरू आहे. मुख्य इमारत पहिल्यांदा घेतली जाते आणि त्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाला सादर केला जातो. शासनस्तरावरुन डॉक्टर आणि पदभरतीची मान्यता मिळाल्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू होऊन जाते. बृहत आराखड्यामध्ये नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर केलेली आहेत. ८० टक्के कामे पूर्ण झाल्यानंतर कर्मचारी वर्गाची मागणी केली जाते. प्राथमिक आरोग्य केंद्र आणि आरोग्य उप केंद्रासाठी १ हेड निर्माण केलेले आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक ३० जून २०१७ रोजी नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली होती. त्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्यावेळी समितीने नाशिक जिल्हा परिषदेमध्ये वर्ग १ ते ४ ची एकूण किती पदे आहेत, त्यामध्ये अनुसूचित जमातीची किती पदे भरण्यात आली आहेत व किती रिक्त आहेत, तसेच बिंदूनामावली कधी प्रमाणित करून घेण्यात आली आहे अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी विदित केले की, दिनांक २९ ऑगस्ट २०१७ पर्यंत बिंदूनामावली प्रमाणित करून घेण्यात आली आहे. सन २०१३ मध्ये बिंदूनामावली

प्रमाणित करून घेण्यात आली होती व आता सन २०१७ मध्ये सर्व संवर्गांची बिंदूनामावली प्रमाणित करून घेण्यात आली आहे. सन २०१७ पर्यंतच्या कालावधीत भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. पदोन्नतीच्या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने दिनांक २९ डिसेंबर २०१७ रोजी निर्णय दिलेला असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना पदोन्नती देण्यास अनुमती देण्यात आली आहे. त्यानुसार सेवाज्येष्ठतेप्रमाणे खुल्या संवर्गातून उमेदवारांना पदोन्नती देण्यात आली आहे.

**जात वैधता प्रमाणपत्राबाबत :**

यावर, समितीने बिंदूनामावली दर ३ वर्षांनी प्रमाणित करून घेणे आवश्यक असताना एक वर्ष विलंब का करण्यात आला बिंदूनामावलीनुसार पदोन्नती, नवीन पद भरती व आरक्षणाच्या रिक्त जागा यांची माहिती समजण्याकरिता दर ३ वर्षांनी तपासून घेणे आवश्यक आहे. सन २०१३ नंतर सन २०१६ मध्ये बिंदूनामावली प्रमाणित करून घेणे आवश्यक होते. ती सन २०१७ मध्ये एक वर्ष विलंबाने प्रमाणित करून घेण्यात आली आहे. भरती प्रक्रिया झाली नसेल तर ठीक आहे. परंतु उक्त १ वर्षाच्या कालावधीमध्ये पदोन्नती देण्यात आली आहे काय, असेल तर ती कशाच्या आधारे देण्यात आली. जिल्हा परिषदेने विहीत कालवधीत बिंदूनामावली प्रमाणित करून घेतली असती तर उक्त निकष अनुसूचित जमाती संवर्गातील उमेदवारांना त्या काळात लागू झाला नसता. माहे डिसेंबर, २०१७ पूर्वी आरक्षण संवर्गातील उमेदवारांना पदोन्नती देता येणे शक्य होते. परंतु संबंधित अधिकारी यांच्या दिरंगाईमुळे बिंदूनामावली न तपासल्याने अनुसूचित जमाती संवर्गातील उमेदवारांना पदोन्नतीचा लाभ त्या काळात मिळू न शकल्याने त्यांचे नुकसान झाले आहे. आता माननीय न्यायालयाचे आदेश असल्याने उक्त संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नती देता येणे शक्य नाही. बिंदूनामावली तपासून घेण्याची ज्या अधिका-यांची जबाबदारी आहे त्यांनी १ वर्ष विलंब केला आहे त्यामुळे पदोन्नतीस पात्र अनुसूचित जमाती संवर्गातील उमेदवारांवर अन्याय झाला असल्याने जबाबदार अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी.

जिल्हा परिषदेतील कर्मचारी यांना पदोन्नती देणे हा अंतर्गत भाग आहे. माहे डिसेंबर, २०१७ पूर्वी बिंदूनामावली तपासली असती तर त्या कालावधीत पदोन्नतीच्या रिक्त पदावर अनुसूचित जमाती संवर्गातील उमेदवारांना पदोन्नती मिळाली असती कारण त्यावेळी न्यायालयाचे निर्बंध नव्हते. सदरहू प्रकरणी जबाबदार अधिका-यांनी चूक केली आहे. समितीने भेट दिली त्यावेळी सूचना दिली होती की, बिंदूनामावली तपासून घेणे ज्यांनी चुका केल्या आहेत त्यांच्यावर कारवाई करून १५ दिवसांच्या आत अहवाल समितीला सादर करण्यात यावा असे समितीने सुचित केले होते.

**अभिप्राय व शिफारशी**

**बिंदूनामावली :**

समितीने, दिनांक ३० जून २०१७ रोजी नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली होती व सदर भेटीच्या अनुषंगाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्यावेळी बिंदूनामावली केव्हा प्रमाणित करून घेण्यात आली आहे याबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नमूद केले की, दिनांक २९ ऑगस्ट २०१७ पर्यंत बिंदूनामावली प्रमाणित करून घेण्यात आली आहे. सन २०१३ मध्ये बिंदूनामावली प्रमाणित करून घेण्यात आली होती. व त्यानंतर आता सन २०१७ मध्ये सर्व संवर्गाची बिंदूनामावली प्रमाणित करून घेण्यात आली आहे. सन २०१७ पर्यंतच्या कालावधीत भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही पदोन्नतीच्या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने दिनांक २९ डिसेंबर २०१७ रोजी निर्णय दिलेला असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना पदोन्नती देण्यास अनुमती देण्यात आली आहे. त्यानुसार सेवाजेष्ठतेप्रमाणे खुल्या संवर्गातून उमेदवारांना पदोन्नती देण्यात आली आहे.

याबाबत समितीचे मत असे आहे की, बिंदूनामावली दर तीन वर्षांनी प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. असे असताना बिंदूनामावली प्रमाणित करून घेण्यासाठी विलंब झालेला आहे. बिंदूनामावलीनुसार पदोन्नती, नवीन पद भरती व आरक्षणाच्या रिक्त जागा यांची माहिती समजण्याकरिता दर तीन वर्षांनी बिंदूनामावली तपासून घेणे आवश्यक आहे. सन २०१३ नंतर सन २०१६ मध्ये बिंदूनामावली प्रमाणित करून घेणे आवश्यक होते. ती सन २०१७ मध्ये एक वर्ष विलंबाने प्रमाणित करून घेण्यात आली आहे. दिनांक ४ ऑगस्ट २०१७ रोजी मा. उच्च न्यायालयाने पदोन्नतीबाबत आदेश दिले आहेत. सदर आदेश येण्यापूर्वीच बिंदू नामावली तपासणी पूर्ण केली असती तर उमेदवारांना पदोन्नती देता आली असती. तथापि, वेळेत बिंदू नामावली अद्ययावत न केल्याने उमेदवारांना पदोन्नतीपासून वंचित राहावे लागले आहे. **त्यामुळे पदोन्नतीस पात्र अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांवर अन्याय झाला असल्याने बिंदूनामावली तपासून घेणे प्रकरणी ज्यांनी दिरंगाई केली आहे त्यांच्यावर कारवाई करून समितीला अहवाल तीन महिन्यात देण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**पर्यवेक्षिका व अंगणवाडी सेविकांच्या रिक्त असलेल्या पदांबाबत :**

समितीला नाशिक दौ-यांच्या वेळी पर्यवेक्षिकांची (अंगणवाडी सेविकांमधून निवडीने) अनुसूचित जमातीची २१ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले. याबाबत विचारणा केली असता समितीला सांगण्यात आले की, माननीय राज्यपाल यांचे दिनांक ९ जून २०१४ रोजीच्या अधिसूचनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पदे स्थानिक अनुसूचित जमाती उमेदवारांमधून भरण्याबाबत आदेश असल्यामुळे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ५ मार्च २०१५ आणि शासन शुद्धीपत्रक दिनांक २६ जून २०१५ नुसार आरक्षण निश्चित केले

आहे. आता त्यांचे प्रमाण बदलल्यामुळे पर्यवेक्षिकांची (अंगणवाडी सेविकांमधून निवडीने) अनुसूचित जमातीची २१ पदे रिक्त दिसत आहेत. तसेच अंगणवाडी सेविकांची ६८ पदे रिक्त आहेत.

एवढ्या मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त राहणे हे खचितच योग्य नाही त्यामुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांवर अन्याय होत असून अंगणवाडीच्या कामावरही त्याचा विपरीत परिणाम होत असतो. **त्यामुळे उक्त पर्यवेक्षिकांची व अंगणवाडी सेविकांची असलेली रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यात यावीत व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे :**

पशुसंवर्धन विभागामध्ये पशुधन विकास अधिकारी, गट-अ आणि गट-ब या संवर्गात १२५ पदे मंजूर असून त्यापैकी ९९ पदे भरलेली आहेत. तसेच २६ पदे रिक्त आहेत. सहायक पशुसंवर्धन विकास अधिकारी या संवर्गातील ३६ पदे भरलेली आहेत. गट-क मध्ये १२७ पदांपैकी १२५ पदे भरलेली असून दोन पदे रिक्त आहेत. **पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी गट-अ आणि गट-ब संवर्गातील रिक्त असलेली २६ पदे व गट-क मधील रिक्त असलेली २ पदे लवकरात लवकर भरण्यात यावीत व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**आरोग्य विभागातील रिक्त पदे :**

समितीच्या दौ-यांच्या वेळी समितीला सांगण्यात आले की, आरोग्य सेवा संचालनालयाकडून दिनांक ८ मार्च २०१६ रोजीच्या पत्रानुसार आरोग्य सेवक (पुरुष) संवर्गातील अतिरिक्त २०४ पदे मंजूर झाली. या शिवाय नवीन उपकेंद्रे मंजूर झाल्यामुळे अजून १३ पदे निर्माण झाल्याने एकूण २१७ अतिरिक्त पदे मंजूर झाली. बिंदू नामावली बदल झाल्याने १४९ पदे रिक्त आहेत. मागील वर्षाच्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेसाठी अतिरिक्त पदे मंजूर झाली आहेत. आरोग्य सेवक (पुरुष) २०४ पदे मंजूर झाली असून आरोग्य सेवक (महिला) ३५९ अतिरिक्त पदे मंजूर झाली आहेत. तथापि भरती करण्यास मान्यता देण्यात आलेली नाही. आरोग्य सेवक (पुरुष) व आरोग्य सेवक (महिला) या संवर्गातील पदे एवढ्या मोठया प्रमाणावर रिक्त असणे ही अतिशय गंभीर बाब आहे. व याबाबत समिती असमाधान व्यक्त करते. **जनतेला आरोग्य विषयक सेवा त्वरीत उपलब्ध होण्याच्या दृष्टीने उपरोक्त दोन्ही संवर्गातील रिक्त पदे शासनाने लवकरात लवकर भरण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**जात पडताळणी :**

जिल्हा परिषदेमध्ये सन १९९५ पूर्वीचे सेवेत रुजू झालेले १३५४ कर्मचारी आहेत. या पैकी १२७४ कर्मचा-यांची जातपडताळणी झालेली आहे. जात पडताळणी न झालेले कर्मचारी ८० आहेत तसेच जात पडताळणी समितीकडे सादर केलेले प्रस्ताव ५२ आहेत.

शिक्षण विभागात (प्राथमिक) ३२ कर्मचा-यांची जात पडताळणी झालेली नाही. त्यापैकी १४ कर्मचा-यांनी समितीकडे प्रस्ताव सादर केलेले असून १८ शिक्षण अधिका-यांनी प्रस्ताव सादर केलेले नाहीत. १२ कर्मचारी वस्तीशाळेमधील आहेत. त्यांचेही जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. जात पडताळणी समितीकडे अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. एखाद्या कर्मचा-याला जात पडताळणी सादर न केल्यामुळे त्याला सेवेतून कमी केले जाते. त्यामुळे असा कर्मचारी न्यायालयात धाव घेतो. **त्यामुळे जात पडताळणी समित्यांकडे असणारी सर्व प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी उमेदवारांकडून राहिलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याची योग्य ती कार्यवाही करण्यात करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**ग्रामीण पाणीपुरवठा योजना :**

समितीच्या नाशिक जिल्ह्याच्या दौ-यांच्या वेळी जिल्हा परिषदेसोबत झालेल्या बैठकीत समितीने, ग्रामीण पाणीपुरवठा उपयोजना बाबतची माहिती देण्यास सांगितले असता समितीला सांगण्यात आले की, ग्रामीण पाणीपुरवठा विभागास सन २०१४- २०१५ या आर्थिक वर्षात ९ कोटी ४४ रुपये प्राप्त झाले होते. त्यापैकी ७ कोटी ५६ लाख रुपये खर्च झालेले आहेत. हा निधी खर्च करण्यास २ वर्षे परवानगी असते, त्यानुसार पुढील आर्थिक वर्षात १०० टक्के निधी खर्च झालेला आहे. सन २०१५-२०१६ मध्ये १२ कोटी १५ लाख इतका निधी प्राप्त झाला होता. त्यातून ५ कोटी १५ लाख ६८ हजार रुपये खर्च झालेले आहेत. त्यावर्षी ६९ योजना होत्या व त्यातील ४५ योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. उर्वरित योजना पुढील आराखड्यात म्हणजेच सन २०१६-२०१७ मध्ये पूर्ण करण्यात आल्या आहेत. सन २०१६-२०१७ मध्ये १४५५ कोटी रुपये प्राप्त झाले होते व त्यातून ७३८ कोटी रुपये खर्च झाले होते. पाणीपुरवठा योजनेची कामे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल अंतर्गत ग्रामपंचायत समित्यांकडून केली जातात तसेच आता मुख्यमंत्री पेय जल योजना हा नवीन कार्यक्रम आलेला असून या योजनेचे अधिकार जिल्हा परिषदेला दिलेले आहेत.

याबाबत समितीचे मत असे आहे की, संबंधित योजना त्या-त्या आर्थिक वर्षात कार्यान्वित होणे अपेक्षित आहे. मागील वर्षीचे पैसे पुढील वर्षी खर्च केले जाऊ शकतात, परंतु मागील वर्षीच्या योजना पुढील वर्षी प्रलंबित ठेवता येत नाहीत. मागील तीन वर्षांपासून त्या त्या वर्षात योजना पूर्ण झालेल्या नाहीत व त्या योजनांचे पैसेही खर्च झालेले नाहीत. **सबब, जिल्ह्यातील ज्या ग्रामीण पाणीपुरवठा योजनांना निधी देऊनही**

**पूर्ण झालेल्या नाहीत, अशा पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्यात याव्यात व केलेल्या उपाययोजनांची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नाशिक व कळवण

### एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नाशिक :

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २९ जून २०१७ रोजी प्रकल्प अधिकारी कार्यालयांस भेट देऊन या कार्यालयातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची भरती,बढती,आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनाबाबतचा आढावा घेतला.

सदर बैठकीच्या समितीने प्रकल्प कार्यालय, नाशिक येथील वर्ग-४ च्या मधील किती कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेली नाहीत. तसेच सरळसेवेने भरावयाची ६८ पदे केव्हा पासून रिक्त आहेत, अशी विचारणा केली असता प्रकल्प अधिकारी नाशिक यांनी विदित केले की, वर्ग-४ मधील एकूण ४ कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. सरळसेवेने वर्ग-४ मध्ये भरावयाची ६८ पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याबाबत बिंदूनामावलीचा प्रस्ताव सादर केला असता मागासवर्गीय कक्षाकडून काही त्रुटीची पुर्तता करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार यासंदर्भात वेळोवेळी पाठपुरावा करून त्रुटीची पूर्तता करण्याची कार्यवाही सुरू आहे.

समितीने, नाशिक जात पडताळणी समितीकडे एकूण किती प्रकरणे प्रलंबित आहेत अशी विचारणा केली असता नाशिक जात पडताळणी समितीकडे एकूण ८ प्रकरणे प्रलंबित असल्याचे सह आयुक्तांनी सांगितले.

समितीने, नाशिक प्रकल्पकार्यालयांतर्गत येणा-या वसतीगृहात वास्तव्यास असणा-या मुलींना कोणकोणत्या सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. याबाबत माहिती देण्यास सांगितले असता प्रकल्प अधिका-यांनी विदित केले की, या प्रकल्पांतर्गत मुलींसाठी १३ शासकीय वसतीगृहे चालविली जातात. यामध्ये एकूण १६१५ मुली वास्तव्यास आहेत. या वसतीगृहातील मुलींना निर्वाहभत्ता दिला जातो. विभागीय स्तरावर प्रती विद्यार्थिनीला ८०० रुपये तर इतर ठिकाणी ५०० रुपये भत्ता दिला जातो. या व्यतिरिक्त स्वच्छता व प्रसाधनासाठी १०० रुपये अधिक दिले जातात. ज्या मुली शारिरीक शिक्षण घेत असतात त्यांना दोन गणवेशासाठी ३००० रुपये दिले जातात. तसेच कार्य शाळेसाठी ५०० रुपये देण्यात येतात.

सन २०१४-२०१५ ते २०१६-२०१७ या वर्षात आदिवासी आश्रमशाळांना व वसतीगृहांना सोयी-सुविधा पुरविण्यासाठी एकूण किती निधी प्राप्त झाला आहे, त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आला आहे, अशी समितीने विचारणा केली असता सन २०१४-२०१५ मध्ये १ कोटी ८९ लक्ष १७ हजार ७२ रुपये खर्च करण्यात आले. सन २०१५-२०१६ मध्ये १ कोटी ३६ लक्ष ५१ हजार ९१८ रुपये व सन २०१६-२०१७ मध्ये २ कोटी ३१ लक्ष ८३ हजार ९६ रुपये खर्च करण्यात आहेत.

ठक्करबाप्पा योजनेमध्ये कोणकोणती कामे घेतली आहेत व त्यासाठी किती निधी प्राप्त झाला आहे अशी विचारणा केली असता प्रकल्प अधिका-यांनी विदित केले की, आदिवासी उपयोजना व उपयोजनाबाह्य क्षेत्राकरिता सन २०१४-२०१५ मध्ये १० कोटी २१ लक्ष रुपये, सन २०१५-२०१६ मध्ये १५ कोटी ७३ लक्ष सन २०१६-२०१७ मध्ये ७ कोटी ४७ लक्ष निधी प्राप्त झाला होता. यामध्ये आदिवासी विकास विभागाच्या वसतीगृहांची कामे हाती घेतली आहेत. यापैकी ज्या वसतीगृहांचे बांधकाम ६० टक्के पूर्ण झाले आहे. ती हस्तांतर करण्यात आली असून ८० ते ९० टक्के कामे झालेली आहे. ती संबंधिताकडून पूर्ण करून घेण्यात येणार आहे.

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, कळवण :**

प्रकल्प अधिकारी कार्यालय कळवण, जिल्हा नाशिक याबाबतची माहिती देताना प्रकल्प अधिका-यांनी विदित केले की, या प्रकल्पामध्ये एकूण तीन तालुके आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये येतात. या प्रकल्पात येणा-या आदिवासी लाभार्थ्यांना विभागातर्फे देण्यात येणा-या सर्व योजनांचा लाभ वेळेत व योग्य पद्धतीने देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

समितीने, दिनांक २९ जून २०१७ रोजी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नाशिक व कळवण या कार्यालयांना दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागाची दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी साक्ष घेतली.

समितीने, धोंडबार, औढेवाडी ही १०० टक्के आदिवासी लोकसंख्या असलेली गावे आहेत. माहे ऑगस्ट,२०१४ मध्ये ही गावे आदिवासी उपयोजनेमध्ये होती, परंतु ही आता पेसामधून वगळली गेली आहेत. आदिवासी विकास विभागाने एक सर्व्हे करून याबाबत अभ्यास केला पाहिजे. आदिवासी उपयोजनेतून निधी दिला जातो. परंतु अशी गावे पेसामध्ये बसवता येत नाहीत. यासाठी विशेष प्रस्ताव तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याचे काम किती कालावधीमध्ये पूर्ण होईल, याबाबत माहिती देण्यास सांगितले असता आयुक्तांनी विदित केले की, पेसा क्षेत्रातील गावांमध्ये जर समावेश करावयाचा असेल तर त्याच्यासाठी राज्य शासनाने सन १९९६ मध्ये जे नियम प्रसिद्ध केले होते. त्यानुसार ग्रामसभा, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी व आयुक्त यांच्याकडे तसा प्रस्ताव यावयास पाहिजे होता. या दोन गावांसह राज्यात अनेक गावे पेसा क्षेत्रामध्ये समावेश करणे बाकी आहेत. हा फार महत्त्वाचा विषय आहे. सन १९८५ मध्ये केंद्र शासनातर्फे पेसाक्षेत्र जाहीर झाले. त्यानंतर सन १९९० मध्ये काही आदिवासी उप योजना बाहयक्षेत्राचा राज्य शासनाने समावेश केला. सन १९८५ ला जे क्षेत्र जाहीर झाले, त्यामध्ये या दोन गावांचा समावेश नव्हता. महाराष्ट्रात तीन हजार गावांचा हा मुद्दा आहे. जे टीएसपीमध्ये आहेत, परंतु अनुसूचित क्षेत्रात नाहीत. सन १९८५ च्या अधिसूचनेमुळे ही गावे समाविष्ट झाली नाहीत. अशा सर्व गावांची माहिती जमा करून पेसा क्षेत्राबाबतची पुनर्रचना करण्याचे काम आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने हाती घेतले असून आता ते अंतिम टप्प्यात आहे. या महिन्यात तो

प्रस्ताव सरकारला सादर करण्यात येईल. त्यामध्ये पेसाचा प्रस्ताव प्रशासन युनिटमध्ये ५० टक्के याप्रमाणे जसा निकषांप्रमाणे आहे, तसाच माडा आणि मिनी माडाचाही प्रस्ताव तयार केलेला आहे. पेसा क्षेत्रातील गाव, पाडा किंवा कोणतेही युनिट यांना जर स्वतंत्रपणे पेसा युनिटचा दर्जा घ्यायचा असेल तर ग्रामपंचायतीने तसा ठराव करणे आवश्यक आहे.

राज्यातील ३००० गावांपैकी ८०० गावांचे असे ठराव झालेले आहेत. परंतु त्या गावांचा समावेश जोपर्यंत पेसा क्षेत्रात होत नाही तोपर्यंत विभागीय आयुक्तांना सन १९९६ च्या नियमाप्रमाणे पेसा ग्रामपंचायत म्हणून जाहीर करता येणार नाही. जी गावे पेसात बसत नाही ती क्लस्टर, माडा, मिनी माडात बसत आहेत का याचा अभ्यास केला असता त्यापैकी ६०० गावे यात बसत आहेत. ३००० पैकी २८००-२९०० गावांना या ना त्या प्रकारचा दर्जा देता येणार आहे. हा ठराव सादर झाल्यानंतर पेसा क्षेत्रात या गावांचा समावेश होईल. त्यानंतर विभागीय आयुक्त पेसा ग्रामपंचायत घोषित करतील. पेसा क्षेत्र जाहीर झाल्यानंतर ५ टक्के निधी भेट त्या पाडा किंवा ज्या ग्रामसभेने निर्णय घेतला, त्यांना दिला जाईल. आतापर्यंत हा ५ टक्के निधी ग्रामपंचायतीला जात होता. सर्व प्रक्रिया येत्या महिन्याभरात शासनाकडे सादर करण्यात येईल.

यावर, समितीने वित्त विभागाकडे मुद्दा पाठवित असताना अर्थसंकल्पातील पाच टक्के रक्कम आपण देयपात्र ठरतो. त्याकरिता आपल्या विभागाने याची तरतूद करावयाची आहे. आदिवासी विकास विभागाने बजेट तयार केले तेव्हा ही पाच टक्के रक्कम स्वतंत्र ठेवणे क्रमप्राप्त आहे, यामध्ये धोरणात्मक निर्णय घेण्याचा विषय नाही. याबाबत संहिता झाली आहे. बजेटच्या ५ टक्के निधी देण्याबाबत राष्ट्रपतींच्या आदेशाप्रमाणे राज्यपालांनी निदेश दिलेले आहेत, म्हणजे थेट राष्ट्रपतींचे याबाबत आदेश आहे. त्यानंतर योजना व योजनाबाह्य निधी देऊ केला आहे.

समितीने, त्यानंतर राज्यात काही ठिकाणी विशेषतः हिंगोली जिल्ह्यात बहुतेक परिसर ओटीएसपीमध्ये आहे. क्लस्टर आहे, १०० टक्के आदिवासी गावे आहेत तेथे निधीच मिळत नाही. याबाबत माहिती देण्यास सांगितले असता अपर आयुक्तांनी विदित केले की, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये ओटीएसपी ही कॅटेगिरी नाही ही राज्य शासनाने केलेली एटीएसपी आहे. त्यामुळे टीएसपी एरियाचा निधी माडा, मिनी माडा मध्ये लाभ देण्यास निर्णय राज्यस्तरावरील असतात. त्यामुळे एटीएसपीसाठी स्वतंत्र अशी तरतूद केलेली नाही. ओटीएसपी क्षेत्रात ५२ टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या आहे पण ओटीएसपीला त्या प्रमाणात निधी मिळत नाही. पण ओटीएसपीमध्ये फक्त वैयक्तिक लाभाच्या योजना हाती घेण्यात येतात त्याकरिता बजेट कमी असते. मंत्रालयीन प्रतिनिधींनी पुढे नमूद केले की, लोकसंख्येच्या प्रमाणातच सर्व जिल्ह्यांना निधीचे वाटप करण्यात येते. जिल्हानिहाय बैठकीच्या वेळी मंत्री महोदय, प्रधान सचिव व क्षेत्रीय पातळीवरील सर्व अधिकारी असतात. त्यांनी एखाद्या विशिष्ट प्रकल्पासाठी अतिरिक्त निधीची मागणी केली तर त्यांना अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला आहे.

समितीने, बिरसा मुंडा योजनेत सिंचन विहीर देताना अडचणी येतात. पूर्वी त्याची मर्यादा १ लाख रुपये होती, आता ती ३ लाखापर्यंत मर्यादा वाढविलेली आहे. लाभार्थी कमी झाले आहेत, बजेट कमी येत आहे. ४-४ हजार लोकांचे अर्ज याकरिता येत आहेत, आपण फक्त १०० लाभार्थ्यांना लाभ देऊ शकतो. त्यामुळे अदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्राला सुद्धा प्राधान्य देण्याबाबत आपण धोरणात्मक निर्णय घ्यावा असे निदेशित केले.

आदिवासी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या शालेय व महाविद्यालयीन शिष्यवृत्ती खात्यावर जमा होण्यासाठी सदर विद्यार्थ्यांचे झिरो बॅलन्स खाते उघडण्यात येते काय, समितीने नाशिक येथे भेट दिली होती तेव्हा विद्यार्थ्यांना पुर्णतः शिष्यवृत्तीचे वाटप झाले नव्हते, याबाबत विभागाकडून तपासणी करून शिष्यवृत्तीचे वाटप झाले की नाही याची तपासणी करण्यात येते काय याची माहिती देण्यास सांगितले असता आयुक्तांनी समितीस अवगत केले की, मॅट्रीकोत्तर अशा दोन प्रकारच्या शिष्यवृत्तीच्या योजना आहेत. मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्ती योजना ग्रामविकास विभागाकडे पूर्णपणे हस्तांतर केलेली आहे. मॅट्रीकोत्तर योजना आदिवासी विभागातर्फे राबविली जाते, याकरिता सर्वांची खाती उघडण्यात आलेले आहेत, झिरो बॅलन्स खात्याकरिता काही अडचण राहिलेली नाही. आधार जोडणीसुद्धा ब-यापैकी झालेली आहे. मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीबाबत मागील वर्षी राहिलेल्या विद्यार्थ्यांचा अनुशेष भरून काढण्याकरिता लक्ष केंद्रीत केले आहे. राज्यामध्ये ४९१ वसतिगृह कार्यरत आहेत. त्यामध्ये प्रवेशाकरिता भरपूर मागणी असते, येथे प्रवेश मिळाला नाही तर त्या मुलांचे खूप हाल होतात. याकरिता विभागाने स्वयं योजना सुरू केली. यावर्षी २० हजार विद्यार्थ्यांच्या बजेटची तरतुद करून ठेवली आहे. त्याकरिता त्या योजनेचा प्रसारही केला आहे. जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य आणि महाविद्यालयातील दरमहा उपस्थिती अनिवार्य केली आहे. त्यांची उपस्थिती वेळेवर येत नाही त्यामुळे प्रदान होत नाही किंवा प्रदानास उशीर होत आहे . स्वयंम योजनेसाठी कमी प्रतिसाद मिळत आहे असेही निदर्शनास आले आहे. योजनेचे पुर्नविलोकन व सुलभीकरण असे दोन्ही बाजूने आम्ही काम करीत आहोत. कॅम्प लावून स्वयंम चे विद्यार्थी वाढविता येतील व तालुका पातळीवर ही योजना कशी नेता येईल हे पहात आहोत. कारण सध्या तालुका पातळीवर ही योजना नाही.

समितीने, यानंतर शिष्यवृत्तीच्या योजनेबाबत समितीच्या कोणत्याही सदस्याचे समाधान नाही. आमच्याकडील व्यावसायिक शिक्षण घेणारे विद्यार्थी स्वयंम योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक असतात तेव्हा ऑनलाईन व ऑफलाईन बंद असते. आदिवासींकरिता अतिशय महत्त्वाचा असा शिष्यवृत्ती हा विषय आहे. याचा लाभ त्यांना मिळत नाही. कोठेतरी विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत आहे. विभाग लक्ष केंद्रीत करीत नाही, १०० टक्के गैरहजर असलेल्या मुलांना शिष्यवृत्ती द्यावी असे आम्ही कोणीही म्हणणार नाही. आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत केंद्र सरकारची योजना असूनही त्यांना शिष्यवृत्ती मिळत नसेल तर ही मोठी शोकांतिका आहे. याबाबत विभागाने गांभीर्याने घ्यावे. असे निर्देशित केले असता आयुक्तांनी शिष्यवृत्ती व स्वयंबाबत समितीने केलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. सुमारे ५३२९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे राहिले आहे. विभागाकडून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबाबत कोणताही त्रास होणार नाही, या दृष्टीकोनातून योग्य ती काळजी घेतली जाईल.

शिष्यवृत्तीसाठी सन २०१७-२०१८ मध्ये १ लाख ४१ हजार अर्ज आले होते, त्यापैकी १ लाख २५ हजार अर्ज मंजूर झाले आहेत. प्रलंबित ५३०० अर्ज आहेत. सन २०१६-२०१७ मध्ये १ लाख ६७ हजार अर्ज आले होते, त्यापैकी १ लाख ५१ हजार अर्ज मंजूर झाले आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये १ लाख ७७ हजार अर्ज आले होते, त्यापैकी १ लाख ५७ हजार अर्ज मंजूर झाले आहेत. प्रकल्प कार्यालय आणि महाविद्यालयात काही अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात विभागाचा पाठपुरावा सुरू आहे.

समितीने, दिनदयाळ उपाध्याय स्वयं योजनेबाबत शासनाने दोन वर्षापूर्वी शासन निर्णय निर्गमित केला होता. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दीनदयाळ उपाध्याय स्वयं योजनेच्या अनुषंगाने ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळत नाही, अशा विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी सदर योजना कार्यान्वित केलेली आहे. यामध्ये किती आदिवासी विद्यार्थी पात्र झाले आणि शिष्यवृत्ती दिली आहे. याची माहिती देण्यास सांगितले असता आयुक्तांनी विदित केले की, यावर्षी दिनदयाळ उपाध्याय स्वयं योजनेत ३ हजार ५०० विद्यार्थ्यांची नोंद झालेली आहे. यापैकी ३ हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली आहे. मागील वर्षी ८५ टक्के शिष्यवृत्तीचे वाटप फक्त झालेले आहे. फक्त १५ टक्के वाटप शिल्लक आहे. प्रकल्प कार्यालय आणि महाविद्यालयात काही अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात विभागाचा पाठपुरावा सुरू आहे. यावर यासंदर्भात प्रकल्प अधिका-यांना योग्य त्या सूचना दिल्या जातील.

यावर समितीने, सुवर्ण जयंती शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना दाखला मिळण्यास खूप अडचणी येत आहेत. परंतु, त्यांना २० हजार रुपये उत्पन्न असल्याचा दाखला देऊ शकत नाही. तलाठी त्यांना दाद देत नाही. गावातील मुख्याध्यापकांकडून उत्पन्नाचा दाखला घेऊन येण्यासाठी सांगितले जाते. जात प्रमाणपत्रासाठी सन १९५० पूर्वीच्या कागदपत्रांची मागणी केली जाते. याच धर्तीवर उत्पन्नाचा दाखला देण्यासाठी कागदपत्रांची मागणी केली जाते. त्यामुळे अनेक आदिवासी बांधव विविध योजनेपासून वंचित रहात आहेत. असा प्रश्न उपस्थित केला असता उत्पन्नाचा दाखला मिळण्याबाबतची उत्पन्नाची मर्यादा १ लाख रुपये करण्यात आली असून दाखला मिळण्यासाठी ग्रामपंचायतीचा दाखला किंवा जातीच्या दाखल्याची मागणी केली जाते असे आयुक्तांनी नमूद केले.

समितीने, पंडीत दिनदयाल उपाध्याय योजनेंतर्गत ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज केला आणि ज्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही त्या सर्व विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळेल या अनुषंगाने कार्यवाही करून त्या संदर्भातील अहवाल सादर करावा. तसेच उत्पन्न मर्यादेबाबत प्रकल्प अधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर होत असलेल्या अन्यायाच्या बाबतीत सुद्धा सुस्पष्ट अहवाल सादर करावा. प्रत्येक प्रकल्प अधिकारी कार्यालयात ३० नोव्हेंबरच्या आत आदिवासी विकास विभाग योजनेच्या माध्यमातून राबविण्यात येणा-या विविध योजना, त्या योजनांच्या पात्रतेचे निकष आणि कोणत्या महिन्यात अर्ज करावे लागतात या संदर्भातील फलक लावण्यात यावा. तद्नंतर या संदर्भातील अहवाल सादर करावा असे निर्देशित केले.

आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या मुलांना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना सुरू करण्यात आली. गेल्या अडीच-तीन वर्षात उक्त शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून आदिवासी समाजाचे किती विद्यार्थी परदेशात गेले अशी विचारणा समितीने केली असता आयुक्तांनी विदित केले की, या वर्षी ६ अर्ज पात्र ठरले होते, त्यापैकी ४ विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती दिली आहे आणि शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा केली आहे. योजनेच्या निकषानुसार ६ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते व त्यापैकी ४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली.

आदिवासी विकास विभागाचा परदेशी शिष्यवृत्ती संदर्भातील शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णयाच्याच धर्तीवरील आहे. समितीने दिलेल्या सल्ल्यानुसार आदिवासी विद्यार्थ्यांपर्यंत ही योजना जास्त प्रमाणात पोहचविली तर या योजनेसाठी चांगला प्रतिसाद मिळविता येईल आणि पुरेशा प्रमाणात आदिवासी विद्यार्थी सुद्धा शिष्यवृत्तीसाठी उपलब्ध होऊ शकतील. या अनुषंगाने विभागाच्या माध्यमातून निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील. या योजनेची प्रसिद्धी प्रकल्प अधिकारी स्तरावरुन करण्यात येते. प्रकल्प अधिकारी स्तरावरुन अधिक व्यापक आणि या योजनेची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचेल अशा पद्धतीने जाहिरात प्रसिद्धीचा आराखडा तयार करण्यात येईल. परदेशात शिक्षण घेण्यासाठी प्रती वर्षी २ कोटी रुपये तरतूद ठेवण्यात येते. यासाठी निधीची मर्यादा नाही. विद्यार्थ्यांची संख्या वाढली तर या रकमेत वाढ सुद्धा करण्यात येते. आदिवासी विकास विभागाची आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI) आहे. परंतु परदेशी शिष्यवृत्तीची योजना आदिवासी संशोधन व प्रशिक्षण मार्फत राबविण्यात येत नाही. सदरहू योजना विभागाच्या नियमित योजनांच्या माध्यमातून राबविण्यात येते.

यावर समितीने, सर्व आदिवासींच्या भावना जपणारी संस्था म्हणून आम्ही आदिवासी संशोधन व प्रशिक्षण या संस्थेकडे पाहतो. आदिवासींची ध्येयधोरणे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण या संस्थेच्या माध्यमातून ठरविली जातात. मध्यंत्तरी काही अज्ञात लोकांनी या संस्थेवर हल्ला केला होता. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण या संस्थेवर झालेला हल्ला म्हणजे आम्ही आदिवासी समाजाच्या जपलेल्या भावनांवर झालेला हल्ला आहे. सदरहू संस्थेवरील हल्ल्याप्रकरणी केवळ पोलीस केस नोंदविण्यात आली आहे. या संदर्भात स्वतः लोकप्रतिनिधींनी मोर्चा काढून जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक कार्यालयास कळविले होते. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण ही संस्था राज्यातील संपूर्ण आदिवासींचे काम पाहणारी संस्था आहे. या संस्थेवर हल्ला झालेला असताना त्याची दखल घेतली जात नाही. जिल्हाधिकारी कार्यालय हे केवळ एका जिल्ह्यापुरते मर्यादित असते. जिल्हाधिकारी कार्यालयावर हल्ला झाला तर दुस-या दिवशी आरोपी पकडून त्यांना जेरबंद केले जाते. या घटनेप्रकरणी पुढे काय कार्यवाही झाली याबाबत शासनस्तरावरून कोणतीही विचारणा झाली नाही. प्रत्येक घटनेच्या वेळी पोलिस विभागाचे ठरलेले उत्तर असते की, आमची या प्रकरणी चौकशी सुरू आहे, आरोपी अद्याप सापडलेले नाहीत, आरोपी सापडल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल. अशा

प्रकारचे ठरलेले उत्तर अपेक्षित नाही, अशा भावना व्यक्त केल्या असता आयुक्तांनी सांगितले की, माझ्याकडे दोन ठिकाणचा कार्यभार असल्यामुळे ज्या दिवशी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण (TRTI) या संस्थेवर हल्ला झाला त्यावेळी मी कार्यालयात नव्हतो. सदरहू हल्ल्याचे सीसीटीव्ही रेकॉर्डींग आमच्याकडे उपलब्ध आहे. आमच्या काही कर्मचा-यांनी हल्लेखोरांना पकडण्याचा सुद्धा प्रयत्न केला. परंतु ते पळून गेले. त्यातील एक जण पकडला गेला. तो बरोबर आलेला पत्रकार होता असे निष्पन्न झाले. आमच्याकडे असलेले सर्व पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि आवश्यक ती सर्व माहिती आम्ही पोलिसांना दिली आहे. तो पत्रकार कोणत्या कारणासाठी आला होता हे सांगू शकत नाही. कर्मचा-यांनी त्या पत्रकाराला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. पुरावे देण्यासाठी कार्यालयातील सर्व कर्मचारी स्वत:हून पुढे आले, कोणीही घाबरून मागे राहिले नाही. कार्यालयातील महिलांनी सुद्धा चांगले धैर्य दाखविले. पोलिसांकडे सर्व पुरावे सोपविल्यानंतर आम्ही पाठपुरावा सुद्धा केला. परंतु सद्य:स्थितीतील तपासाची माहिती मला घ्यावी लागेल.

समितीने, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेस (TRTI) केंद्र सरकारचा निधी आला होता. केंद्र सरकारच्या निधीच्या माध्यमातून विविध जातीचे संशोधन करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही चालू होती. त्या अनुषंगाने दिनांक २२ डिसेंबर २०१६ रोजी आदिवासी विकास विभागाने एक पत्रक काढले होते की जे संशोधन होणार आहे ते अद्याक्षरानुसार व्हायला पाहिजे, परंतु मध्येच कोणत्या तरी जातीचे संशोधन होत आहे, तसेच सदर कार्य महात्मा ज्योतिबा फुले विद्यापीठाला दिले आहे असेही समितीच्या निदर्शनास आले आहे. एका जातीचे संशोधन होत असताना मध्येच दुस-या जातीचे संशोधन करणे ही बाब संयुक्तिक नाही. असे लक्षात आणून दिले असता विभागाच्या प्रतिनिधींनी विशद केले की, हे काम पुणे विद्यापीठाला दिले आहे. हे खरे आहे ४५ जमातींचा मानववंशीय शास्त्रीय अहवाल तयार करावयाचा होता. सध्या तसा अहवाल नसल्याने आपल्याकडे असलेल्या समित्यांना मार्गदर्शक म्हणून अशाप्रकारची तयारी करून घेत होतो. अनुसूचित जमातीच्या यादीतील काही जमातीच दर्शवून त्यांचा आधी अभ्यास करण्यास टीआरटीआयकडून सांगण्यात येत आहे असे निदर्शनास आणून दिले असा विभागाने आपल्या ४५ जमातीमधील १ ते १५ या अनुक्रमाने सुरुवात करावी. त्यानंतर १६ ते ३० आणि त्यानंतर ३१ ते ४५ या प्रमाणे पुणे विद्यापीठाकडून अभ्यास करावा, अशा सूचना दिलेल्या आहेत आणि त्याप्रमाणे कार्यवाही सुरू आहे.

संस्थेकडून हा प्रकल्प जेव्हा पुणे विद्यापीठाला दिला तेव्हा त्यांच्या मानववंश शास्त्र शाखेने त्याचे अभ्यास करण्यासाठी पाच वर्षाचा आराखडा सादर केला होता. तथापि पाच वर्षे हे काम चालू राहणे योग्य नाही. हे काम लवकरात लवकर पूर्ण होणे आवश्यक आहे म्हणून वसतिगृहातील त्या त्या भागातील आणि संबंधित जमातीची जी मुले आहेत त्या मुलांना प्रशिक्षण देऊन त्यांनाच अन्वेषक म्हणून काही ठिकाणी वापरायचे आणि त्यांनी तो प्रश्न सोडवायचा, असा नवा आराखडा करून घेतला. नव्या आराखड्यानुसार डिसेंबर २०१९ पर्यंत ४५ जमातींचा अभ्यास पूर्ण होणार आहे अनुसूचित जमातींच्या यादीतील पहिल्या १५ जमातीचे सर्वेक्षण पूर्ण झालेले असून त्याचा अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. पुढील जमातींचे मे महिन्यापर्यंत आणि

तिसरा टप्पा जून ते डिसेंबर पर्यंत पूर्ण होईल. पुणे विद्यापीठाचा मानववंश शास्त्रीय विभाग हा जुना आणि चांगला असून नावाजलेला विभाग आहे. हा विभाग प्रामुख्याने सांस्कृतिक सानिध्य, त्यांचे हावभाव व बुजरे पणाची लक्षणे, त्यांची भाषा, त्यांची देव देवता, पद्धती, रुढी परंपरा यांचा अभ्यास ते करीत आहेत.

समितीने, आदिवासी विभागाच्या माध्यमातून मंत्रालय स्तरावर काळा घोडा येथे एक कार्यालय भाडे तत्वावर घेण्यात आले आहे. त्याबाबत माहिती देण्यास सांगितले असता मंत्रालयीन प्रतिनिधींनी विदित केले की, मंत्रालयामध्ये विभागासाठी जी जागा आहे, ती फार अपुरी जागा आहे. आदिवासी विकास विभागासाठी सहा, सात हजार कोटी रुपयांचे अंदाजपत्रके असते, त्यातून अपर आयुक्त कार्यालय, प्रकल्प कार्यालय आणि आदिवासी विभाग, जिल्हा मध्यवर्ती बँक या अशा जवळपास १६-१७ यंत्रणांना आपण पैसे देतो, परंतु याचे कोणतेही मुल्यमापन आणि संनियंत्रण आपल्याकडून होत नाही. एकदा निधी आपल्या खात्याकडून गेला की, जबाबदारी संपल्यासारखे होते. आदिवासी विभागाच्या माध्यमातून वेगवेगळ्या यंत्रणेला पैसे देतो, तो व्यवस्थित समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतो की नाही हे जाणण्यासाठी एक यंत्रणा तयार करायची होती. आदिवासी विकास विभागाच्या वेगवेगळ्या योजना चालतात. इतर विभागाच्या वेगवेगळया योजना आहेत. त्याचे मुल्यमापन आणि संनियंत्रण व्हावे, त्यासाठी एक वेगळी यंत्रणा निर्माण करावी. त्यासाठी मंत्रालयाच्या आजुबाजूला जागा नव्हती म्हणून काळा घोडा येथे कार्यपद्धती फॉलो करून एक जागा निश्चित केली. जवळजवळ सव्वापाच हजार चौरस फुटाची ही जागा आहे. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था केंद्र येथे सुरू झाले त्याचे उद्घाटन मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १० एप्रिल २०१८ रोजी केलेले आहे. येथून केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या मिळून २७५ योजना आहेत. याचे मुल्यमापन व संनियंत्रण तेथून करीत आहोत. तसेच ५०२ आश्रमशाळाचे नियंत्रणही येथून होत असते. यासाठी मंत्रालयीन कक्ष अधिकारी,अवर सचिव, उप सचिव याशिवाय तज्ज्ञ व्यक्तींची आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून नियुक्ती झालेली आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

**पेसा क्षेत्रात गावांचा समावेश करण्याबाबत :**

(१) समितीने, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी घेतलेल्या साक्षीच्यावेळी नाशिक जिल्ह्यातील विशेषतः धोंडबार, औढेवाडी या गावासह इतर अनेक गावे तसेच राज्यातील ३००० गावांपैकी ८०० गावांमध्ये १०० टक्के आदिवासी लोकसंख्या असूनही त्याचा आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये अजूनपर्यंत समावेश करण्यात आलेला नाही. ३००० गावांपैंकी ८०० गावांचा समावेश जोपर्यंत पेसा क्षेत्रात होत नाही तोपर्यंत विभागीय आयुक्तांना सन १९९६ च्या नियमाप्रमाणे पेसा ग्रामपंचायत म्हणून जाहीर करता येणार नाही. जी गावे पेसा क्षेत्रात बसत नाही ती क्लस्टर, माडा, मिनीमाडात बसत आहेत का याचा अभ्यास केला असता त्यापैकी ६०० गावे या निकषात बसत आहेत असे समितीच्या निदर्शनास आले. **राज्यात सन १९९६ पासून पेसा कायदा**

**लागू होऊन सुद्धा समावेश न झालेल्या उक्त ६०० गावांचा आदिवासी उपयोजना क्षेत्रात समावेश करण्याबाबत शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**आदिवासी उपयोजनेंतर्गत राबवावयाची बिरसा मुंडा योजना :**

आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत राबविण्यात येणा-या बिरसा मुंडा योजनेत सिंचन विहीर देताना लाभार्थी कमी मिळत असल्याचे विभागाकडून समितीच्या निदर्शनास आणून दिले. तथापि, या योजनेसाठी जवळपास ४-४ हजार लोकांचे अर्ज येऊन सुद्धा फक्त १०० लाभार्थ्यांना आदिवासी उपयोजनेतून लाभ देण्यात येतो असे समितीला आढळून आले आहे. **याबाबत समितीची अशी शिफारस आहे की, बिरसा मुंडा योजनेंतर्गत आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्राचा सुद्धा विचार करून त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी.**

**आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबतः**

(२) विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी आदिवासी विदयार्थ्यांना द्यावयाच्या शालेय व महाविद्यालयीन शिष्यवृत्ती, खात्यावर जमा होण्यासाठी सदर विद्यार्थ्यांचे झिरो बॅलन्स खाते उघडण्यात येते. मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्ती योजना ग्रामविकास विभागाकडे पूर्णपणे हस्तांतरित केलेली आहे. मॅट्रीकोत्तर योजना आदिवासी विभागातर्फे राबविली जाते. आधार जोडणी सुद्धा बहुतेक पूर्ण झालेली आहे. मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीबाबत मागील वर्षी राहिलेल्या विद्यार्थ्यांना पूर्णतः शिष्यवृत्तीचे वाटप झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

समितीला याबाबत पुढे असे सांगण्यात आले की, ४९१ वसतिगृह कार्यरत आहेत त्यामध्ये प्रवेशाकरिता भरपूर मागणी असते तेथे प्रवेश मिळाला नाही तर त्या मुलांचे खूप हाल होतात याकरिता विभागाने स्वयंम योजना सुरू केली आहे. निर्वाह भत्ता, आहार भत्ता हे ठरल्याप्रमाणे देण्यात येते. यावर्षी २० हजार विद्यार्थ्यांच्या बजेटची तरतूद करून ठेवली आहे त्याकरिता या योजनेचा प्रसारही केला आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, आतापर्यंत स्वयंम योजनेला जास्त प्रतिसाद मिळालेला नाही. स्वयंम योजनेचे आता पुर्नविलोकन केले असता त्यात आढळून आले आहे की, यामध्ये जातवैधता प्रमाणपत्र अनिवार्य करण्यांत आले आहे तसेच महाविद्यालयातील दरमहा उपस्थिती अनिवार्य केली आहे त्यामुळे स्वयंम योजनेसाठी कमी प्रतिसाद मिळत आहे. विद्यार्थ्यांची उपस्थिती वेळेवर येत नाही त्यामुळे प्रदान होत नाही किंवा प्रदानास उशीर होत आहे. स्वयंम योजनेचे पुर्नविलोकन व सुलभीकरण असे दोन्ही बाजूने करण्यात येत आहे. शिबीर घेऊन स्वयंम योजनेचे विद्यार्थी वाढविता येतील व तालुका पातळीवर ही योजना कशी नेता येईल हे पाहण्यात येत आहे, कारण सध्या तालुका पातळीवर ही योजना अस्तित्वात नाही.

याबाबत समितीने स्पष्ट केले की, व्यावसायिक शिक्षण घेणारे विद्यार्थी स्वयंम योजनेचा लाभ घेण्यास इच्छूक असतात, याचा लाभ त्यांना मिळत नाही यासंदर्भात विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत आहे. **आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत केंद्र सरकारची योजना आहे. या योजनेंतर्गत ज्या विद्यार्थ्यांना अद्याप शिष्यवृत्ती देण्याचे राहिले आहे त्यांना शिष्यवृत्ती देण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(३) पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयंम रोजगार योजनेच्या अनुषंगाने ज्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश मिळत नाही, अशा विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी सदर योजना कार्यान्वित झाली आहे. या योजनेत ३५०० विद्यार्थ्यांपैकी ३००० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. उर्वरीत ५०० विदयार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे अर्ज संबंधित प्रकल्प अधिकारी कार्यालय व महाविद्यालयात प्रलंबित आहेत. **सबब, प्रलंबित असलेल्या ५०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(४) दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी आदिवासी विकास विभागाच्या घेतलेल्या साक्षीच्यावेळी आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना आदिवासी विभागातर्फे राबविण्यात येत असल्याचे समितीस सांगण्यात आले. तथापि सदर योजनेंतर्गत गत तीन वर्षात परदेशात पाठविण्यात येणा-या विद्यार्थ्यांची संख्या अत्यंत अल्प असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर योजनेचे लाभार्थी वाढविण्यासाठीही तालुकास्तरापर्यत नेण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी. त्यासाठी या योजनेची जास्तीत-जास्त लोकांना माहिती व्हावी म्हणून राज्यस्तरावरून स्थानिक पातळीपर्यंतच्या मुख्य वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करून या योजनेचा प्रचार करण्यात यावा. परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याच्या योजनेंतर्गत विद्यार्थी संख्या व शिष्यवृत्तीचे प्रमाण वाढविण्याची आवश्यकता असल्याने **याबाबत समिती अशी शिफारस करते की, परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याच्या योजनेंतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या व शिष्यवृत्तीच्या निधीत वाढ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी.**

## (समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)

## पहिली बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २९ जून २०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(४) श्री. प्रभुदास भिलावेकर वि.स.स
(५) श्री. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.
(६) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.
(७) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(८) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.
(९) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१०) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः**
श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी.

**जिल्हाधिकारी कार्यालय :**

(१) श्री. राधाकृष्णन बी, जिल्हाधिकारी नाशिक,
(२) श्री. दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकार,
(३) श्री. अमोल एडगे, सहा. जिल्हाधिकारी, नाशिक
(४) श्री. रामदास खेडकर, निवासी उप जिल्हाधिकारी
(५) श्री. संदीप गोलाईत, अप्पर आयुक्त, नाशिक
(६) श्री. संजय बागडे, सहायक आयुक्त (मावक)
(७) श्री. दिनकर जे. पावरा, सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक
(८) श्री. आर. रामानुजन, उप वन संरक्षक अधिकारी, नाशिक.

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचां-याच्या जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

**दुसरी बैठक**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक ३० जून २०१७ रोजी जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(४) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(५) श्री. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.
(६) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.
(७) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(८) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.
(९) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१०) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
(२) श्री. आनंद रहाटे, कक्ष अधिकारी.

**जिल्हापरिषद कार्यालय :**

(१) श्री. दिपक कुमार मिना, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. डी. बी. मुंडे, महिला बाल कल्याण अधिकारी
(३) श्री. प्रदीप चौधरी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी
(४) श्री. संदीप गोलाईत, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक
(५) श्री. संजय बागडे, सहायक आयुक्त, (मावक)
(६) श्री. दिनकर पावरा, सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक
(७) श्री. अमोल ऐडगे, प्रकल्प अधिकारी, नाशिक.

उक्त बैठकीत समितीने जिल्हापरिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचां-याच्या जात पडताळणीविषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

**तिसरी बैठक**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे झाली, सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(३) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.
(४) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(५) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव
(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती).

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग.
(२) श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग
(३) श्री. अरविंद सिंह, प्रधान सचिव, ऊर्जा विभाग
(४) श्री. राधाकृष्णन बी. जिल्हाधिकारी, नाशिक
(५) श्री. किरण कुलकर्णी, आयुक्त, आदिवासी विकास विभाग
(६) श्री. गिरीश सरोदे, अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग
(७) श्री. विशाल गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, जि. नाशिक
(८) श्री. व्यंकटेश भट्ट, उप सचिव, गृह विभाग
(९) श्री. गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विकास विभाग
(१०) श्री. टि. वा. करपते, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग
(११) श्री. ल. गो. ढोके, उप सचिव, आदिवासी विकास विभाग
(१२) श्री. संदीप गोलाईत, सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक
(१३) श्री. संजय बांगडे, सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष.

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी, जिल्हापरिषद व आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचां-याच्या जात पडताळणीविषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

**चौथी बैठक**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) प्रा डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
(३) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.
(४) श्री. अमित घोडा, वि.स.स.
(५) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(६) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.)
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव
(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव, (समिती)
(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

**समितीने या बैठकीत प्रारूप अहवालावर विचार केला व तो आवश्यक त्या सुधारणांसह संमत केला.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

[किंमत : रुपये १२५]